MAHARASHTRA MANDAL CHICAGO

# रचना



## गणेशोत्सव विशेषांक २०२६

मातीमधुनी या विश्वाला
साकारून देतो
अमूर्त 'तो' परि अपुल्यासाठी
मूर्तिरूप घेतो!

# -अनुक्रमणिका-


| | | |
|---|---|---|
| • संपादकीय | | १५ |
| • अध्यक्षीय | | १७ |
| • 'रचना' चमू | | १९ |
| • MMC पदाधिकारी २०२६ : परिचय आणि फोटो | | २० |
| • शिकगो मराठी शाळा कर्यकारिणी | | ३२ |
| **लेख - माझ्या आठवणीतला गणेशोत्सव** | | |
| • गंपतीबाप्पा मोरया | रश्मी चाफेकर | ३४ |
| • माझ्या आठवणीतला गणेशोत्सव | वैशाली बेलसरे | ३७ |
| • गणेशोत्सव – आठवणींचा सुगंध आणि बदलत्या काळाची कहाणी | विक्रांत सतीश वैद्य | ३९ |
| • माझ्या आठवणीतला गणेशोत्सव | मिताली खासबाग | ४२ |
| • माझ्या आठवणीतला गणेशोत्सव | अुमा दिघे | ४४ |
| • माझ्या आठवणीतला गणेशोत्सव | विनय भालेराव | ४६ |
| • गणेशोत्सव | धनश्री कुलकर्णी | ४८ |
| • माझ्या आठवणीतला गणेशोत्सव | Ayush Sheth | ५० |
| • आठवणीतला गणेशोत्सव | शिल्पा देशपांडे | ५२ |
| **कथा** | | |
| • बाबू, बाळ, आणि बाला | रत्नांगी मालपेकर | ५५ |
| **लेख** | | |
| • एक तरी ओवी अनुभवावी- ज्ञानेश्वरीतील ओंकाररूपी श्रीगणेश | श्रीदत्त राऊत | ५९ |
| • माशीची भ्रमणगाथा | सुलक्षणा कुलकर्णी | ६२ |
| • कृष्ण साहाय्य | सुहासिनी येवलेकर | ६५ |
| **कविता** | | |
| • कविता | श्रद्धा भट | ६७ |
| • कविता | नीला जोशी | ६८ |
| • गुरुपौर्णिमा | मनीषा गजेंद्रगडकर पंडित | ६९ |

| | | |
|---|---|---|
| **वृत्तान्त** | | |
| • गणेशोत्सव २०२६ | राजीव गोखले | ७0 |
| • शिकागो मध्ये रंगले कवी संमेलन | माधव गोगावले | ७३ |
| **शब्दकोडे** | अभिजित रायरीकर | ७८ |
| **गंमत शब्दांची**<br>षडयंत्र | डॉ. द.दि. पुंडे | ८० |
| **बोधप्रश्नोत्तरी** | प. पू. श्री. मंगेशदादा फडके | ८१ |
| **तन- मनाचा भोवरा**<br>अगोराफोबिया (Agoraphobia) | रश्मी वडवळकर | ८३ |
| **खवय्येगिरी**<br>• सफरचंदाचं लोणचं | दिप्ती पाटखेडकर | ८७ |
| **शब्दकोडे उत्तर** | | ८८ |

**क्षणचित्रे :**

- गणेशोत्सव २०२६ — ८९-९२
- इतर उपक्रम — ९३-९६

**MMC झूम कट्टे आणि त्यांचे आयोजक** — ९७-११३

- MMC झूम कट्ट्यांच्या कार्यक्रमपत्रिका — ११४-१२१


MALABAR
GOLD & DIAMONDS
THE SEASON OF JEWELLERY
THE SEASON OF OFFERS
SAVE UP TO
50%
ON MAKING CHARGES OF GOLD (22K)
UNCUT DIAMOND, POLKI & PRECIOUS GEM JEWELLERY
T & C Apply*
PLUS, ENJOY UP TO
40% OFF
ON DIAMOND,
PRECIOUS GEM & POLKI VALUE
0% ZERO DEDUCTION
ON 916 OLD GOLD EXCHANGE
NO MAKING CHARGES
ON 8GM GOLD COINS
VALID UNTIL 8TH NOVEMBER 2026
NEW JERSEY | CHICAGO | DALLAS | NAPERVILLE | LOS ANGELES
ATLANTA | AUSTIN | SANTA CLARA | SEATTLE


www.tanishq.com
TANISHQ
A TATA PRODUCT
Exquisite Craftsmanship.
Iconic Designs.
Crafted for You.
4300 East New York Street, Opp. Fox Valley Mall, Aurora, 60504


THIS DIWALI, COME HOME TO PNG
FREE GOLD COIN
FLAT 40% OFF*
22K GOLD JEWELRY STARTING FROM
0% MAKING CHARGES*
0% DEDUCTION*
Offer validity from 11 Oct - 15 Nov 2026. | Extended Store Hours During Diwali
PNG
JEWELERS
For Facetime Shopping: Call +1 650-476-3927
Visit us: 791 E El Camino Real, Sunnyvale, CA 94087 | Call: 408 245 6764 | www.pngjewelers.com


Expert Insurance Team
AN INTEGRITY PARTNER OFFICE
Licensed with major carriers in all 50 states.
Guiding You to a Healthier Tomorrow
TURNING 65?
MEDICARE DOESN'T HAVE TO BE CONFUSING.
Understand your deadlines. Avoid costly mistakes.
Choose coverage that fits your doctors, medications, and budget.
SHYAM ANTURKAR
Licensed Insurance Agent
DON'T WAIT UNTIL YOUR BIRTHDAY MONTH
Missing the right Medicare deadline may lead to coverage gaps or lifelong penalties.
PERSONALIZED MEDICARE GUIDANCE
MEDICARE
Enrollment and coverage guidance
MEDICARE SUPPLEMENTS
Help filling coverage gaps
MEDICARE ADVANTAGE
Compare plan benefits and networks
PRESCRIPTION DRUG PLANS
Review medication coverage
Do I enroll now? Can I delay? Will my doctors and prescriptions be covered?
More Healthy Days Ahead
GET ANSWERS BEFORE YOU CHOOSE
Call
(847) 721-7039
Email
santurkar09@gmail.com
Office
110 Croftwood Court,
Rolling Meadows, IL 60008
Scan to Text Shyam


RE/MAX
RE/MAX
VASEE JANARTHANAM
RE/MAX Plaza
Gurnee, IL


PATANKAR LAW P.C.
ATTORNEYS AT LAW
AMEYA PATANKAR | MONICA PATANKAR
Attorney at Law
Attorney at Law
WITH OUR BEST COMPLIMENTS FROM PATANKAR LAW, P.C.
Estate Planning
Taxation
Real Estate Buy & Sale
Family Law
Business Formation
Personal Injury
Traffic Law
1700 NORTH FARNSWORTH AVENUE, SUITE 28, AURORA, IL 60505
959 W. OGDEN AVE., NAPERVILLE, IL 60563
CALL US TODAY 630-820-8877
www.patankarlaw.com


Akshit Creations
AKSHIT CREATIONS
AC
by Swapna Gundawar
Home of Original Yeola
Paithani Sarees
PAITHANI SAREES ▪ LEHENGAS ▪ DUPATTA
▪ JACKETS ▪ IRKAL ▪ GADHWAAL ▪ PATOLA
▪ KANJIVARAM SAREES ▪ NARAYANPET SAREES
PURE SILK, SOFT SILK, HANDMADE,
MACHINE MADE SAREES
Follow us on
#akshitcreations 224-286-2444


About Us
At Cruz Investments & Wealth Management, we believe everyone should be able to live the retirement they've always wanted. Our team of professionals can help you create a well-thought-out strategy, using a variety of investments and insurance products and services, designed to help you address your financial needs and concerns.
Why Choose Us
With our custom "Cruz SMART Plan" you will get a 360-degree review of your financial picture, including how your retirement assets are integrated and work together. From there, we'll craft a strategy to help you get to your goals.
CRUZ
Investments & Wealth Management
"Cruzing into Retirement"
S Sources of Income
M Medical & Healthcare
A Advanced Financial Planning
R Risk Management
T Tax Efficient Strategies
ReyCruz.com | 630-897-0333


SANJAY MARATHE
REAL ESTATE CONSULTANT &
LOAN ORIGINATOR(NMLS#2668043)
Ask M
ESTATE SOLUTIONS
kw INFINITY
KELLERWILLIAMS
608 S Washington st Ste 100 Naperville IL 60540
630 915 2970
sanjaym@kw.com
kwlends.com/loan-officer/smarathe


Braulio Valladares
Insurance
State Farm
Insurance
Auto · Home · Life
Health · Business
Auto
Home
Life
Health
Business
847-672-9004
www.myagentbraulio.com
State Farm
We help families understand their assets, liabilities, and risks.
The right decisions today prevent money problems tomorrow
Money fixes money problems.


NRI
SPECIAL
OFFER
वारसा
PUSHPAM
P52800080169
Timeless Investment
Plots for sale Starts @ ₹30 lakhs*
Only 85
Sea-View NA Plots
5 mins from
Kolthare Beach
Fully Developed
Infrastructure
Scenic Coastal
Location
High Land
Appreciation
Clear Title &
Documentation
Easy Road
Connectivity
Ready for
Construction
Legacy Investment
for Generations
Signature Features at Varsa
Dapoli
Dapoli, near Kolthare Beach
By Road Distance
Mumbai to Dapoli - 205.8 kMS
Pune to Dapoli - 190 kMS
For More Details ( USA contact )
Mr. Rahul Visal
+1 (630) 656-4700
www.pushpamvarsa.com


Dr. Usha Mahisekar
Memorial Sanskrit Library
Chicago, IL
YOUR NEW LIBRARY IS OPEN!
Dr. Usha Mahisekar
Memorial Sanskrit Library
3691 Darlene Ct, Suite 101 Aurora, IL 60504
SUNDAYS 10:00 AM – 12:00 PM
Visit our library – where Indian classical languages bring ancient wisdom to life!
In-person weekly programs like samksheparamayanam, adityahrudayam chanting etc.
Contact for more details:
Meera: 312-767-7728 | Lakhu Iyer : 630-730-8641
Ulka: 773-961-4571 | Laxminarayan Mahisekar: 708-752-1945
Stay tuned for more library opening days and hours!

# Charles Rutenberg Realty

*"The Standard of Excellence"*

*Please contact us for all of your real estate needs*



Sangeeta Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 728-4871
sangeeta_chavan@yahoo.com



Hemant Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 660-6231
hxchavan@yahoo.com

Serving the Downtown Chicago Area & All Suburbs

BUY

SELL

INVEST

RENT

***Free Market Evaluation of Your Property***

**Detailed Comparative Market Analysis to Buy or Sell Your Property**

+ Primary Home
+ Investment Properties
+ Rental Properties
+ Commercial Properties

**Home Staging & Extensive Network of Licensed Professionals**

+ Inspectors
+ Mortgage Brokers
+ Attorneys
+ Handyman

Charles Rutenberg Realty
"The Standard of Excellence"

**OUR OFFICE**

3135 Book Road
Naperville, IL 60564

For all Your Real Estate Needs,
**Contact Us**

Sangeeta & Hemant Chavan
(630) 728-4871 / (630) 660-6231





**BUY, SELL, RENT, & INVEST!**

In Downtown Chicago area & all suburbs. We offer quality service at every step! We treat you as our friend, not our customer.

**Call us for a free consultation or market evaluation of your property!**

Charles Rutenberg Realty
"The Standard of Excellence"



Moksha - Liberation is eternal right of every soul
SRI UPASANA
Working for Spiritual Ritual Integration
ॐ
पा
पा
श्री
स
स
ना
Together in Faith,
Together in Service,
Together as One Family.
HANUMAN
DATTATREYA
SHIVA
DEVI
GANESHA
OUR SERVICES
UPASANA & BHAJAN SEVA
Bhajan, kirtan, and devotional programs for spiritual upliftment and community bonding.
PUJA & RITUAL SERVICES
Personal & family pujas, abhishek, havan, sankalp and other Vedic rituals.
PARAYAN SERVICES
Parayan of
• Ram Charita Manas
• Guru Charitra
COUNSELING & GUIDANCE
Spiritual counseling and guidance to support mental, emotional and spiritual well-being.
SPIRITUAL & CULTURAL EVENTS
Satsang, pravachan, festivals, and cultural programs for all ages.
SERVICE & VOLUNTEER OPPORTUNITIES
Be a part of seva activities and make a positive impact.
Strengthen Spirituality
Preserve Our Culture
Support All Generations
Inner Peace & Well-Being
Build a Stronger Community
JOIN US!
Be a part of our journey in spirituality, culture and service.
228 WHISPERING HILLS DR
NAPERVILLE, IL 60540
WHATSAPP
630 853 7297 / 630 664 1481
EMAIL
upasana@sriupasana.org
WEB
sriupasana.org


Let Me Help You With All Your Insurance Needs
AUTO
HOMEOWNERS
CONDO
RENTERS
LIFE
MOTORCYCLE
POWER SPORTS
BOAT
UMBRELLA
LANDLORD
RETIREMENT
Allstate
MK Insurance Group
Allstate.
You're in good hands.
Illinois: (847)305-1160
480 W Half Day Rd, Buffalo Grove, IL 60089
Helping to insure families in Illinois and Wisconsin
MK INSURANCE GROUP
Email:
MichaelKuster@Allstate.com
Please call us for a Free Insurance Quote.
Michael Kuster
Allstate Agent


ICICI Bank
Now serving locally from
Naperville, Illinois
NRI support without
time-zone hassle
Visit our Naperville office
Mall of India – Route 59,
Naperville, Illinois - 60540
+1-630-873-1173
9:00 a.m. to 5:00 p.m. (CST)


ICICI Bank
Abhijeet Bora
Senior Relationship Manager
ICICI Bank Limited
Illinois Representative Office
776, Illinois Rte 59, Naperville, IL 60540
abhijeet.bora@icicibank.com
+1 (630) 873 1173
+1 (229) 510 2229
www.icicibankusa.com

# संपादकीय

**न**मस्कार प्रिय वाचक हो,

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या गजरात आपण गणपती बाप्पाला निरोप दिला. परंतु गणेशोत्सवाच्या आठवणी अजूनही मनात रेंगाळत आहेत. या आठवणी केवळ आजच्याच नाहीत, तर थेट १८९३ पासूनच्या आहेत. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली, तेव्हा उद्देश एकच होता, की विखुरलेली माणसं एकत्र यावीत. या कल्पनेने असे काही भव्य रूप घेतले, की आज इतक्या वर्षांनंतरही त्याच उत्साहात आपण गणेशोत्सव साजरा करतो, फक्त त्याचे स्वरूप बदलले आहे एवढेच!

आपल्याला आठवतो, तो साधेपणाने साजरा केलेला गणेशोत्सव. वर्गणी गोळा करण्यासाठी गल्लीत फिरणारी मुलं, सकाळ संध्याकाळ ऐकू येणारे आरतीचे स्वर, रात्री कीर्तनासाठी जमलेली मंडळी, रांगोळी स्पर्धा, नाट्याभिनय स्पर्धा अशा विविध स्पर्धांनी गाजलेले, गजबजलेले दहा दिवस. मूर्ती आणताना वाजणारे ढोल-ताशे आणि विसर्जनाच्या दिवशी डोळ्यात येणारे पाणी...हा खरा उत्सव होता. या गणेशोत्सवाने आपल्यापैकी प्रत्येकाला काही ना काही दिले आहे. मग ते सार्वजनिक गणेशोत्सवात आपली कला सादर करून मोठे झालेले कलावंत असोत, गणेशोत्सवाच्या आयोजनातून घडलेले नेते असो किंवा मूर्तिकार, चित्रकार, मखरकार असोत; प्रत्येकाला या गणेशोत्सवातने काही ना काही दिले आहे. या विशेषांकात आम्ही तोच आठवणीतला गणेशोत्सव पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. आज डीजेच्या कर्णकर्कश आवाजात हरवत चाललेला गणेशोत्सव पुन्हा एकदा आधीसारखा निर्मळ, निखळ होईल का? निदान आपल्या आठवणीतल्या गणेशोत्सवाला तरी आपण पुन्हा पुन्हा जागवत राहायला हवे. म्हणजे तो या झगमगाटात हरवून जाणार नाही.

काळाचे चक्र कधीच उलटे फिरवता येत नाही. ज्या काळात आपण जगत असतो, त्यापेक्षा पूर्वीचा काळ चांगला होता, असे आपल्याला सतत वाटते, याचे कारण गेल्या तीस-चाळीस वर्षात खऱ्याखुऱ्या माणसांचं जग मागे टाकून आपण पुढे आलो आहोत. कुटुंब म्हणून असलेला एकपणा, एकमेकांच्या फक्त सहवासाने मिळणारा आनंद आज आपण गमावून बसलो आहोत, आणि एका आभासी जगात मोठ्या कौतुकाने जगत आहोत, म्हणूनच या अंकात, जुना गणेशोत्सव ज्यांनी पाहिला आहे, त्या अनेकांच्या आठवणी आम्ही गोळा केल्या आहेत, त्या आपल्याला आपल्या हरवलेल्या दिवसांची सफर नक्कीच घडवून आणतील.

या व्यतिरिक्त, गंमत शब्दांची, शब्दकोडे, पाककृती, मंडळाच्या गणेशोत्सव कार्यक्रमाचा वृतान्त, तनमनाचा भोवरा वगैरे तुमची आवडती सदरे आहेतच.

पुराणातील कथेनुसार माता पार्वतीने स्वतःच्या शरीराच्या मळापासून एका बालकाची निर्मिती केली, ज्याचे मस्तक नंतर भगवान शंकराने कापले आणि तिथे हत्तीचे मुख लावून त्याला जिवंत केले. शरीराचा मळ हा माणसाचा ‘अहंकार’ दर्शवतो आणि हत्तीचे मस्तक हे विवेक, अथांग ज्ञान आणि ईश्वरी बुद्धीचे प्रतीक. माणसाचा अहंकार गेल्याशिवाय त्याला खरी ईश्वरी बुद्धी प्राप्त होत नाही आणि तो ‘गणेश’ अर्थात गणांचा अधिपती, पूर्ण पुरुष बनू शकत नाही, असा विचार वेदांत मांडलेला आहे. आज व्यक्तींमधला वाढत चाललेला अहंकार आणि त्या सामूहिक अहंकाराला खतपाणी घालणारे संकुचित नेतृत्व अशा वातावरणात तर गणेशोत्सवाची खरी गरज आहे. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने उत्सवातील विकृतींचे विसर्जन करून संस्कृतीचे वैभव अधिक शुद्ध, प्रगल्भ आणि वैचारिक करू या!



सुजाता महाजन



शिल्पा देशपांडे



रश्मी चाफेकर

# अध्यक्षीय

नमस्कार,

मी दिपाली सावंत, महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६ ची अध्यक्षा.

मी मूळची कोकणकन्या. लहानपणीच्या गावाकडच्या असंख्य आठवणी आजही मनात ताज्या आहेत. गणपती उत्सवाची लगबग, घराघरांत होणारी स्वादिष्ट जेवणे, पारंपरिक खेळ, नाच-गाणी, टाळ-मृदंगाचा गजर, आरत्या आणि आपुलकीने भरलेले ते वातावरण—या सगळ्या आठवणी आजही मनाला आनंद देतात.

महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६ च्या मार्च ते जून या कालावधीत आपल्या सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अनेक संस्मरणीय कार्यक्रम यशस्वीपणे पार पडले. प्रत्येक कार्यक्रमात आपल्या मराठी संस्कृतीचा, परंपरेचा आणि एकोप्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.
गुढीपाडवा, पदवीधरांचा गौरव सोहळा, विशेष सांस्कृतिक उपक्रम, मराठी शाळेचे कार्यक्रम, स्वयंसेवा उपक्रम, तसेच विविध सामाजिक आणि बौद्धिक कार्यक्रमांद्वारे आपल्या समुदायाला एकत्र आणण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने केला. या प्रत्येक उपक्रमामध्ये स्वयंसेवक, कार्यकारिणी सदस्य, विश्वस्त, प्रायोजक आणि आपल्या सर्व सदस्यांनी दिलेले सहकार्य हेच आमचे खरे बळ ठरले.
आपल्या मुलांमध्ये मराठी भाषा, संस्कृती आणि परंपरेची आवड निर्माण करण्याबरोबरच सर्व वयोगटांना एकत्र आणणारे कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. प्रत्येक कार्यक्रमातून नवीन कल्पना, नव्या मैत्री आणि समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची प्रेरणा मिळते.
महाराष्ट्र मंडळ शिकागो हे केवळ एक सांस्कृतिक व्यासपीठ नसून, ते आपल्या सर्वांचे दुसरे कुटुंब आहे. हे कुटुंब अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि उत्साही बनवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.
मार्च ते जून या कालावधीत आमच्या प्रत्येक उपक्रमाला दिलेल्या प्रेम, विश्वास आणि सहकार्याबद्दल मी सर्व सदस्य, स्वयंसेवक, देणगीदार, प्रायोजक आणि कार्यकारिणीचे मनःपूर्वक आभार मानते. आपण सर्वांनी अशाच उत्साहाने आगामी कार्यक्रमांनाही साथ द्यावी, हीच अपेक्षा.

यंदाच्या महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या गणेशोत्सवात जुन्या सुंदर आठवणींना पुन्हा उजाळा देण्याचा आमचा छोटासा प्रयत्न आहे. आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि गावाकडच्या गणेशोत्सवाचा अनुभव आपल्या सर्वांना पुन्हा एकदा एकत्र मिळावा, हीच आमची मनापासून इच्छा.
चला, आपण सर्वजण मिळून हा गणेशोत्सव आनंद, उत्साह आणि मराठी संस्कृतीच्या रंगांनी अविस्मरणीय बनवूया!

चला, आपल्या संस्कृतीचा वारसा पुढील पिढीपर्यंत अभिमानाने पोहोचवू या आणि महाराष्ट्र मंडळ शिकागोची परंपरा अधिक समृद्ध करूया.
जय महाराष्ट्र! जय शिकागो!



**दिपाली सावंत**
**अध्यक्षा, महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६**

# 'रचना' चमू



सुजाता महाजन - संपादक



शिल्पा देशपांडे - संपादक



रश्मी चाफेकर - संपादक



चेतन रेगे - सल्लागार



अनन्या भुसकुटे
मांडणी आणि सजावट



स्वरा सुर्वे
मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावट



श्रीवल्लभ दामले
मुद्रितशोधन (इंग्रजी)

# MMC Executive Committee (केंद्रिय कार्यकारी समिती )



**दिपाली सावंत ( अध्यक्षा)**

शिकागोलँड परिसरात २८ वर्षांपासून वास्तव्य असून, महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) च्या नृत्य टीममध्ये सहा वर्षांहून अधिक काळ सक्रिय सहभाग.
२०२१ मध्ये MMC च्या संचालक मंडळावर (Board of Director) कार्य केले आणि परंपरा व ग्रॅज्युएशन टीमचे नेतृत्व केले. २०२२ मध्ये पुन्हा निवड होऊन परंपरा, ग्रॅज्युएशन आणि फ्लायर टीमचे नेतृत्व पुढे चालू ठेवले. २०२३ मध्ये ग्रॅज्युएशन आणि डेकोरेशन टीमचे नेतृत्व केले आणि २०२५ मध्ये पुन्हा एकदा ग्रॅज्युएशन टीमचे नेतृत्व केले.
२०२५ मध्ये BMM च्या 'रेशीमगाठी' प्रकल्पात सक्रिय सहकार्य केले. २०२६ मध्ये महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहे. अध्यक्ष म्हणून नृत्य, खाद्यव्यवस्था आणि सजावट अशा सर्व टीम्ससोबत काम करताना, BMM च्या 'रेशीमगाठी' प्रकल्पाला सहकार्य सुरू ठेवले. तसेच २०२५ आणि २०२६ मध्ये मराठी शाळा टीममध्येही सक्रिय सहभाग नोंदवला.



**रत्नांगी मालपेकर -उपाध्यक्षा**

- इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मॅनेजर
- गेली २० वर्षे अमेरिकेत वास्तव्य
- MMC २०२६ च्या कार्यकाळात मी सर्वसमावेशक कारभार आणि व्यवस्थापनावर भर देणार आहे .



**चेतन रेगे - उपाध्यक्ष**

My name is Chetan Rege, and I have been a proud resident of Chicago for over 19 years. A bibliophile and history enthusiast, I remain committed to preserving Indian heritage while nurturing a vibrant Marathi community through cultural, educational, and leadership initiatives.

It has been my privilege to serve Maharashtra Mandal Chicago (MMC) in multiple roles — Executive Committee member (2023, 2025) and Secretary (2022). I also had the honor of conceptualizing and leading the Chhatrapati Shivaji Maharaj Monument initiative (CSM 350), inspired by the legacy of Chhatrapati Shivaji Maharaj, in collaboration with dedicated volunteers and community organizations.

My other engagements include conceptualizing and administering MMC Itihas Manch (since 2021), contributing as editor of MMC Rachana Magazine (2019), and volunteering as a teacher at MMC Chicago Marathi Shala (since 2017), alongside active involvement in theatre, cultural, and educational programs.

As Vice President for 2026, I aim to bring impactful programs, energize weekly online engagement, strengthen the MMC–Marathi Shala connect, encourage wider participation, and foster collaboration among volunteers and like-minded organizations — continuing this journey of seva with humility, dedication, and a shared commitment to community growth.



**प्रियेश देशपांडे - सचिव**

- IT Professional
- गेली चौदा वर्षं अमेरिकेत वास्तव्य
- मी या वर्षी मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये सहभागी होऊन IT टीम सांभाळत आहे व त्याद्वारे अधिकाधिक मराठी लोकांना मंडळाशी जोडण्याचा माझा प्रयत्न राहील.



**आशिष नगरकर - कोषाध्यक्ष**

- Oracle Financials Consultant
- 20 years living in USA
- BMM Marketing Team - 2011
- MMC कोषाध्यक्ष - २०१३
- MMC उपाध्यक्ष - २०१७
- MMC अध्यक्ष - २०१८
- MMC सुवर्ण महोत्सव कोषाध्यक्ष - २०१९
- MMC विश्वस्त - २०१९ ते २०२१
- MMC कोषाध्यक्ष - २०२६
- likes to work and give it back to community.

# संचालक मंडळ (Board of Directors)

| | |
|---|---|
|  | **हृषिकेश घोडके**<br><br>Cloud Network Specialist (IT)<br>दहा वर्षांपासून अमेरिकेत वास्तव्य.<br>मराठी संस्कृती आणि ढोल-ताशा ही माझी आवड आहे. यावर्षी तुमच्या सहकार्याने ढोल-ताशा पथक अधिक चांगले आणि मजबूत करण्याचा माझा प्रयत्न असेल. प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन नवीन सदस्यांना मदत करणे आणि टीमसोबत मिळून काम करणे हे माझे उद्दिष्ट आहे. |
|  | **मनिषा पंडित**<br><br>• IT professional<br>• गेली दहा वर्षं अमेरिकेत वास्तव्य<br>• MMC २०२६ च्या कार्यकाळात विविध वयोगटांच्या लोकांना एकत्र आणून भजन सेवा आणि decorating corners हा उपक्रम राबवणार आहे. ह्याचप्रमाणे महाराष्ट्र मंडळाच्या विविध कार्यक्रम संचलनात माझा कार्यशील सहभाग राहील. |

| | |
|---|---|
|  | **ब्रिजेन सावंत**<br>My family and I have been members and volunteers of MMC for several years.<br>Since 2024, I have actively taken on more roles & responsibilities in MMC teams such as<br>Facilities & stage team, Food service team, Decoration setup team, Dhol-Tasha team etc.<br>I have also worked in other international volunteer organizations in executive roles & would like<br>to bring my expertise and experience to MMC for the benefit of our community and cultural<br>heritage! |
|  | **पल्लवी पाटील**<br><br>मी सौ. पल्लवी पाटील. माझे पती अमित, मुलगी अमूल्या आणि मुलगा आदित्य असा आमचा परिवार आहे. आम्ही २००५ पासून शिकागोमध्ये राहतो आणि मी Blue Cross Blue Shield मध्ये Data Analytics विभागात कार्यरत आहे.<br>२०२३ पासून मी महाराष्ट्र मंडळ शिकागोशी सक्रियपणे जोडली गेली असून फूड, डेकोरेशन आणि परंपरा टीममध्ये volunteer आणि admin म्हणून काम केले आहे. यंदाच्या वर्षी बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सदस्य म्हणून, मी फूड टीमची liaison म्हणून काम पाहणार असून डेकोरेशन आणि यूथ टीममध्येही सहभाग घेणार आहे. |

**अनघा देऊळकर**



Namaskar Mandali!
I'm Anagha Dewoolkar. This year I'm serving as one of the Board of Directors on MMC 2026 team.
I'm so excited for this opportunity. I will also be on Bhramangatha and Parampara team and serve as MMC liaison.



**सुजित कुळकर्णी**

नमस्कार,

मी सुजित कुळकर्णी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या २०२६ च्या कार्यकारिणीमध्ये 'बोर्ड ऑफ डायरेक्टर' (अतिरिक्त संचालक) म्हणून कार्यरत आहे. पंधरा वर्षं अमेरिकेत वास्तव्यास असून व्यवसायाने मी एक आय टी प्रोफेशनल आहे .

यंदाचे ध्येय आणि संकल्प (Goals for 2026)

या वर्षी मंडळाच्या माध्यमातून मी दोन प्रमुख क्षेत्रांत योगदान देणार आहे:

१. अध्यात्मपीठ (Adhyatmpeeth):

लोकांना मानसिक शांती आणि आध्यात्मिक प्रगती साधता यावी, यासाठी 'अध्यात्मपीठ' या उपक्रमांतर्गत मी विविध अभ्यासपूर्ण आणि माहितीपूर्ण व्याख्याने आयोजित करणार आहे.

२. सुविधा संघ (Facility Team):

महाराष्ट्र मंडळाच्या विविध कार्यक्रमांसाठी सर्वोत्तम सभागृह आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी 'फॅसिलिटी टीम' मध्ये सक्रिय सहभाग घेणार आहे.

धन्यवाद 🙏



**राहुल विसाळ**

- रिअल इस्टेट गुंतवणूकदार, मार्गदर्शक आणि प्रशिक्षक
- गेली २८ वर्षं अमेरिकेत वास्तव्य
- या वर्षी मी स्पॉन्सरशिप, मार्केटिंग आणि समदुायाशी जोडणी या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करणार आहे.
- आपल्या कार्यक्रर्यमांना अधिक भक्कम पाठबळ मिळावे, नवीन संधी निर्माण व्हाव्यात आणि MMC ची ओळख आणखी व्यापक व्हावी यासाठी मी मनापासून प्रयत्न करणार आहे.



**मोनिका पाटणकर**

- व्यवसायाने वकील.
- अरोरामध्ये 'पाटणकर लॉ' हे स्वतःचे Law Office.
- Estate Planning ( Will, Trust, Power of Attorney), Real Estate closing, Personal Injury, Traffic Law, Family Law इत्यादी कामे हाताळण्याचा अनुभव.
- गेली काही वर्षे महाराष्ट्र मंडळात कार्यरत.
- यावर्षी ती मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये प्रत्यक्ष सहभाग.



**अनिकेत सावंत**

अरोरा इथे राहतो.
गेली अकरा वर्षं अमेरिकेत वास्तव्य.
मी कार्यक्रमाचे फ्लायर्स तयार करणार आहे आणि Facilities व IT टीमसोबत काम करणार आहे.

| | |
|---|---|
|  | **प्रीती उंडाळे**<br><br>• Physical Therapy Technician<br>• पंधरा वर्षांपासून अमेरिकेत वास्तव्य.<br>• मी MMC २०२६ साठी डान्स टीमची जबाबदारी सांभाळत आहे. टीमसोबत विविध प्रकारचे डान्स सादर करण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच, आरास टीमलाही शक्य तेवढी मदत करणार आहे. |

# MMC Board of Trustees (विश्वस्त मंडळ)



विशाल नवलकर



रश्मी चाफेकर



नमीता वेदक



माधव गोगावले



कश्मिरा मगर

## MMC INVESTMENT ADVISORY COMMITTEE
## (गुंतवणूक सल्लागार समिती)



चैतन्य आगाशे



पराग जोशी



श्याम अंतुरकर

## MMC's BMM प्रतिनिधी आणि
## BMM कार्यकारिणी सदस्य २०२६-२८



उल्का नगरकर

## MMC's Registered Agent



पंकज अकोलकर

# शिकागो मराठी शाळा कार्यकारिणी



**कविता वाडकर**
शिकागो मराठी शाळा संचालिका



**अक्षदा सावंत**
शिकागो मराठी शाळा कोषाध्यक्ष



**चेतन रेगे**
महाराष्ट्र मंडळ - मराठी शाळा समन्वयक



**निलेश अग्रवाल**
शाखा संचालक - बफेलो ग्रूव्ह / व्हिलिंग



**अरुंधती जाधव**
शाखा संचालिका - नेपरव्हील



**मयुरा देशपांडे**
शाखा संचालिका -शॉम्बर्ग

## शिकागो मराठी शाळा विश्वस्त (सल्लागार)



**दिपाली सावंत**



**आशिष नगरकर**



**प्रिया तेलवेकर**



**निलेश जोशी**



# आठवणीतला गणेशोत्सव



# आठवणीतला गणेशोत्सव



## गंपतीबाप्पा मोरया!

**ध**त्तड तत्तड, धत्तड तत्तड, धत्तड तत्तड!

आजही कुठेही हा नाद ऐकला, की पुण्यातल्या गणपती उत्सवाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. अर्थात ह्या आठवणी खूप वर्षांपूर्वीच्या पुण्यातल्या आहेत.
बाप्पांच्या आगमनाच्या बऱ्याच आधी सुरू व्हायची, ती मनाची आणि जनांची तयारी! म्हणजे घरात येणाऱ्या गणपतीची आणि सार्वजनिक गणेशोत्सवाची, दोन्हीची! दोन्हीकडे, उत्सव कसा करायचा ह्याची चर्चा! काहींच्या घरचा गणपती दीड दिवसाचा, काहींचा पाच तर काहींचा दहा. सार्वजनिक गणेशोत्सव दहा दिवसांचा.

ह्या सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात व्हायची, ती वर्गणी मागायला येणाऱ्या कार्यकर्त्यांपासून. आपल्या आजूबाजूच्या सगळ्या वाड्यात जाऊन वर्गणी मागणारी, त्यासाठी कधी ओरडा खाणारी तर कधी उपदेश ऐकून घेणारी ही तरुण मुलं मनापासून हे काम करायची. मग हळूहळू गणेशोत्सवाचं वातावरण निर्माण व्हायला लागायचं. स्टेज अगदी पहिल्या खांबापासून उभं राहण्याची प्रक्रिया बघण्यात मजा असायची आणि ह्यावर्षी हे मंडळ कसल्या प्रकारची आरास करणार, कुठला देखावा उभा राहणार ह्याची उत्सुकता पण असायची. पण एकदा स्टेज उभं राहिलं, की मग जे काही घडायचं ते मात्र पडद्याआड. उत्सुकता ताणणं म्हणतात ते हेच! सगळीकडेच ओसंडून वाहणारा उत्साह आणि त्यातला साजेसं वातावरण!

काही दुकानांमध्ये मन लावून बाप्पाच्या मूर्ती तयार करणारे शिल्पकारही नजरेस पडायचे. त्यांचं ते आजूबाजूच्या परिसराचं,परिस्थितीचं भान विसरून मूर्ती तयार करणं हा देखील एक सुखद अनुभव असायचा.

सगळ्या दुकानात लहान मोठ्या, बसलेल्या, उभ्या, विविध पोजमध्ये असणाऱ्या गणेशाच्या मूर्ती दिसायला लागायच्या. प्रत्येक मूर्ती वेगळी पण तरीही प्रत्येक मूर्तीच्या डोळ्यातले भाव , हसरा चेहरा आपल्याला नतमस्तक व्हायला लावायचा. बाप्पाचं आगमन हाच एक प्रसन्न प्रसंग असायचा. तो अजूनही असतो असं मला वाटतं.

एक एक करत घरी , आणि सार्वजनिक मंडळात येणाऱ्या बाप्पाच्या मूर्तीची निवड व्हायची. मला वाटतं आपण मूर्ती निवडतो, असं म्हणण्यापेक्षा कोणत्या बाप्पाने कुठे जायचं, हे बाप्पाच ठरवतात.

नेहमीच गजबजलेल्या पुण्याच्या मंडईला एक वेगळंच स्वरूप यायचं मंडईत, तुळशीबागेत किंवा इतर दुकानांमध्ये गणपतीसाठीच्या वस्त्रांची, दागिन्यांची आणि ती विकत घेणाऱ्या भक्तांची अगदी रेलचेल असायची. आणि हे सगळं करताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, उत्साह हा अगदी अवर्णनीय असायचा.

ही सगळी तयारी करून पुणं सज्ज व्हायचं आणि गणेश चतुर्थीच्या दिवशी,

'गणपती बाप्पा मोरया'च्या, ढोलताशांच्या गजरात पुणं न्हाऊन निघायचं. सार्वजनिक गणेशोत्सवात वेगवेगळ्या मंडळांनी केलेली आरास बघायला झुंबड उडायची. ह्या काळात पुण्यात अगदी मध्यवर्ती राहण्याची मजा काही औरच असायची. मंडळांनी स्पीकरवर लावलेली गाणी ही पण बाप्पाच्या आगमनाची ग्वाही देणारीच असायची. म्हणजे ' तू सुखकर्ता तू दुखहर्ता',' प्रथम तुला वंदितो', 'गणराज रंगी नाचतो', ' अष्टविनायका तुझा महिमा कसा', ' गणराज रंगी नाचतो' यासारखी. त्यावेळेला डीजे वगैरे प्रकार नव्हते.

ही गाणी ऐकत असतानाच ऐकू यायची, ती घरासमोरून जाणाऱ्या लोकांची वर्दळ, त्यांची बडबड,त्यांच्या हसण्याचा, त्यांनी वाजवलेल्या पिपाण्यांचा (किंवा एक पिटपिट आवाज करणारं काहीतरी असायचं ज्याचं नाव मला आठवत नाही) आवाज. कधी कधी रात्री ह्याचा त्रास व्हायचा पण सकाळी पुन्हा बाप्पांच्या आरत्यांनी वातावरण प्रसन्न होऊन जायचं.

आणि ह्या सगळ्यावर शिरपेच असलेले पुण्यातले मानाचे पाच गणपती , कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरूजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती,केसरी वाडा गणपती आणि त्यातच सोने पे सुहागा असलेले दगडूशेट, मंडईचे गणपती. ह्याच सार्वजनिक गणेशोत्सवात हौशी आणि व्यावसायिक कलाकारांचे अनेक कार्यक्रमही होत असत. दहा दिवस बाप्पाच्यासमोर म्हटल्या जाणाऱ्या आरत्या, घंटानाद, वाटला जाणारा प्रसाद हे सगळं अनुभवायला मिळणं, ही पण एक अत्यंत सुखद गोष्ट असायची.

बघता बघता दहा दिवस कसे जायचे, ते कळायचंच नाही आणि मग यायचा अनंत चतुर्दशीचा दिवस, बाप्पांच्या विसर्जनाचा दिवस. बाप्पा निघाले, ह्या विचाराने येणारी एक उदासीनता, 'गणपती निघाले गावाला चैन पडेना आम्हाला' अशा गर्जनांमधून थोडी फार का होईना जाणवायची. पण त्याचबरोबर, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' ह्या वाक्याने उभारी पण यायची.

अनंत चतुर्दशी म्हणजे मिरवणुकीचा दिवस. माझं आजोळ भर लक्ष्मीरोडवरच असल्यामुळे सुदैवाने मिरवणूक बघण्यासाठी जागा पटकावणे वगैरे प्रकार करण्याची कधी वेळ आली नाही..तिसऱ्या मजल्यावर जाऊन बाप्पांच्या दर्शनाला तयार व्हायचं. हवेत उडणारा गुलाल, त्याच्या लाल रंगात न्हाऊन निघालेले, ढोलताशे,झांजा ह्यांच्या तालावर नाचणारे आणि नाचता नाचता उंच ध्वज फडकवणारे भक्तगण बघताना नकळतच पावलं थिरकायला लागायची, हात ताल धरायला लागायचे, सगळ्यांच्या बरोबरीने 'गणपती बाप्पा मोरया 'चा गजर केला जायचा. सुरुवातीला ही मिरवणूक फार काळ चालायची नाही,पण जशी वर्ष लोटली तशी मिरवणूक लांबत जायला लागली. तरीही लोकांचा आणि हो, आमचाही उत्साह कमी व्हायचा नाही. मात्र रात्रीचे काही गणपती पाहून झाल्यावर झोप अनावर व्हायची आणि आम्हा मुलांची स्वारी घरात यायची.

जड अंत:करणाने बाप्पांना निरोप दिला जायचा तो त्यांच्या पुढच्यावर्षीच्या आगमनाची वाट बघतच!
गेल्या कित्येक वर्षात पुण्याचा गणपती बघण्याची संधी मला मिळालेली नाही पण बघूया कधी जमतंय ते. जुन्या पुण्यातले गणपती आणि आत्ताच्या बदलेल्या पुण्याच्या गणपतीत झालेले बदल कसे असतील? ह्या काळातले देखावे कसे असतील? AI generated असतील का अजूनही लोक आपल्या कल्पनाशक्तीला चालना देऊन, समाजाला काहीतरी शिकवणारे देखावे करत असतील? लोकांची गजबज तशीच असेल का? आता गणपतीत कोणती गाणी ऐकायला मिळत असतील?

प्रश्न तर खूप आहेत. त्यातल्या काहींची उत्तर गुगल महाशय किंवा यू ट्यूब देवी देतीलच, पण पुण्याला जाऊन प्रत्यक्ष गणेशोत्सव कधी बघायला मिळतोय, ते काळच ठरवेल! सध्या तरी मी शिकागोमधल्या वेगवेगळ्या घरातले गणपती आणि त्यांची आरास, लोकांची लगबग हे बघण्यातला आनंद घेते आहे. तुम्हां सर्वांना लवकरच येणाऱ्या गणेशोत्सवाच्या शुभेच्छा!
'गणपती बाप्पा मोरया'!!!!



रश्मी चाफेकर

# आठवणीतला गणेशोत्सव



**ग**णपती हा “देव बाप्पा” आहे, हे मला फारच उशिरा जाणवलं. मुंबईत वाढल्यामुळे गुजरातीशीही जवळून संबंध होता आणि त्यात आजोबांना “बाप्पा” असंही म्हणतात. सो “गणपतीबाप्पा” म्हणजे घरचाच असं लहानपणी वाटायचं! पूर्वी जसे पाहुणे घरात येऊन काही दिवस राहायचे आणि मग जायचे, तसाच बाप्पाही येतो आणि जातो. पण तो जाताना मात्र ह्रदयात कळ उठते आणि समुद्रावरून परत आल्यावर त्याची मोकळी जागा बघवत नाही, हे कुठच्याच पाहुण्याबाबत घडलेलं आठवत नाही.

आमच्याकडचा गणपती अगदी घरगुती असायचा - मोठ्ठं थोरलं मखर नाही , मोठमोठ्याने म्हटलेल्या आरत्या नाहीत, की वाद्यांचा आवाज नाही. पण आरत्या सर्वांच्या तोंडपाठ ! हातात कुणी पुस्तक धरल्याचं आठवत नाही.

दुसरं म्हणजे गणपतीची भेट घ्यायला कुणाला आवतण धाडायला लागायंच नाही. कॉलनीतल्या बायका घरचं सगळं आटपून अगदी दहा साडेदहाला यायच्या - थकलेल्या पण गणपतीचं दर्शन घ्यायला उत्सुक! त्यांचं तितक्याच आद्रतेने स्वागत करायला तयार माझी आई! शेवटी बाईला बाईच समजून घेऊ शकते ना?

दुसरी गोष्ट म्हणजे गणपती घरात असताना घर बंद करायचं नाही हा दंडक! हा इतका भिनला होता अंगात, की मैत्रिणीच्या घरी आईला दर्शनाला जाता यावं म्हणून आमचं प्लानिंग सेशन चालायचं !

खाण्यापिण्याची, नैवेद्याची सगळी जबाबदारी आईवर टाकून सगळे निर्धास्त असले, तरी दुर्वा खुडून आणायची आणि घरची प्राजक्ताची फुलं वेचून ती निवडून त्यांचे बाप्पाला रोज हार करण्याची आणि बाकीची अंगणातली फुलं वेचायची जबाबदारी माझी होती. मी ती नेहमीच पार पडली, असं काही म्हणता येणार नाही. गणपतीला हार नसला, की आजोबा डोळे वटारून माझ्याकडे पहायचे. शहाण्याला (?) तो अशाब्दिक मार पुरे असायचा. दुसऱ्या दिवसापासून हार तयार असायचा.

गौरींचा मात्र थाटच वेगळा असायचा. आमच्याकडे उभ्याच्या गौरी असायच्या शाडूच्या मुखवट्याच्या! त्यांच्या साड्या , दागिने, आरास सगळ्यात लगबग असायची ! आणि गौरी आगमनाच्या दिवशी मी आणि आई गौरीच्या पावलांनुसार चालून त्यांना सगळे घर दाखवायचो. मला नेहमी प्रश्न पडायचा, की त्या माहेरवाशिणी आहेत तर त्यांना घर माहीत नाही का? त्यांचं उत्तर मला एकदा माझ्या आत्याकडून अचानक मिळालं. ती म्हणाली एकदा, की तिची मुलगी घरी आली तर घरभर हिंडली आणि काय काय बदल झालाय तो टिपून त्यांच्याबद्दल तिने चौकशी केली. क्लिक !!! मला गौरीला घर का दाखवायचं, ते कळलं !!

मला नेहमी वाटतं, की काहीही उपचार न करता बाप्पाला नुसतं घरी आणलं आणि मनोभावे त्याची पूजा केली, तरी तो प्रसन्न होईल! शेवटी आमचा “बाप्पा” आहे तो ! घरातलाच !



वैशाली बेलसरे

# आठवणीतला गणेशोत्सव



## गणेशोत्सव - आठवणींचा सुगंध आणि बदलत्या काळाची कहाणी

“गणपती बाप्पा मोरया , मंगलमूर्ती मोरया ” हा जयघोष कानावर पडला, की आजही मन नकळत बालपणात जाऊन पोहोचते. गणेशोत्सव हा केवळ एक धार्मिक सण नाही, तर तो आपल्या संस्कृतीचा, कुटुंबातील प्रेमाचा, समाजातील एकोप्याचा आणि असंख्य सुंदर आठवणींचा उत्सव आहे. काळ बदलला, जीवनशैली बदलली, शहरं बदलली, पण बाप्पाविषयीची श्रद्धा आणि त्याच्याशी जोडलेल्या आठवणी आजही तितक्याच जिवंत आहेत.

माझ्या लहानपणी पुणे आणि सोलापूरमध्ये गणेशोत्सवाची एक वेगळीच रंगत असायची. गणेश चतुर्थीच्या काही दिवस आधीपासूनच घरात उत्साहाचं वातावरण निर्माण व्हायचं. बाप्पाची मूर्ती कुठून आणायची, सजावट कशी करायची, याची चर्चा सुरू व्हायची. बाजारात गेल्यावर विविध प्रकारच्या मूर्ती पाहताना डोळे भरून यायचे. प्रत्येक मूर्ती सुंदर वाटायची आणि शेवटी सर्वांच्या पसंतीने आपल्या घरच्या बाप्पाची निवड व्हायची.

बाप्पाची मूर्ती घरी आणण्याचा दिवस म्हणजे जणू एखाद्या मानाच्या पाहुण्याचं स्वागत करण्याचा दिवस! “गणपती बाप्पा मोरया”च्या जयघोषात मूर्ती घरी आणली जायची. घराच्या उंबरठ्यावर आई औक्षण करायची, फुलं उधळली जायची आणि अत्यंत भक्तिभावाने बाप्पाला त्याच्या सजवलेल्या आसनावर विराजमान केलं जायचं. त्या क्षणी घरात एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हायची.

बाप्पाच्या प्राण-प्रतिष्ठापनेनंतर दररोज सकाळ-संध्याकाळ आरती, नैवेद्य आणि प्रसाद यांचा नित्यक्रम सुरू व्हायचा. उकडीचे मोदक, करंजी, लाडू, शिरा अशा विविध पदार्थांचा सुगंध संपूर्ण घरात दरवळत असे. आरतीच्या वेळी घरातील प्रत्येक सदस्य उपस्थित असायचा. लहान मुलांपासून ते आजी-आजोबांपर्यंत सर्वजण टाळ्या वाजवत मनापासून आरती म्हणायचे. त्या आरतीत भक्ती होती, आनंद होता आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे संपूर्ण कुटुंब एकत्र असल्याचं समाधान होतं.

आमच्या सोसायटीतील सार्वजनिक आरती तर आणखी खास असायची. संध्याकाळ झाली, की सर्वजण एकत्र जमायचे. मोठ्या आवाजात आरती, टाळ-मृदंगाचा गजर आणि मुलांच्या उत्साहाने संपूर्ण परिसर भारून जायचा. आरतीनंतर प्रसाद घेत गप्पांचा फड रंगायचा. या दिवसांत शेजारी, मित्र, नातेवाईक यांच्यातील नातेसंबंध अधिक घट्ट व्हायचे. गणेशोत्सव म्हटलं,की विविध स्पर्धांचीही पर्वणी असायची. प्रश्नमंजुषा, वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन, चित्रकला, निबंध लेखन, भजन, नृत्य, गायन अशा अनेक स्पर्धांमध्ये मुलं आणि मोठी माणसं उत्साहाने सहभागी व्हायची. जिंकणं महत्त्वाचं नव्हतं; सहभागातून मिळणारा आत्मविश्वास, नवीन मित्र आणि शिकण्याची संधी हीच खरी कमाई असायची. या स्पर्धांमुळे आमच्यासारख्या अनेक मुलांमध्ये मंचावर बोलण्याचं धाडस आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

सगळ्यात सुंदर गोष्ट म्हणजे या उत्सवात संपूर्ण कुटुंबाचा सहभाग असायचा. बाबा सजावट करत, आई नैवेद्याची तयारी करत असे, आजी पूजा सांगायची आणि आम्ही मुलं फुलं आणणं, आरतीची तयारी करणं, प्रसाद वाटणं अशा छोट्या-छोट्या कामांमध्ये रमून जायचो. या छोट्या जबाबदाऱ्यांमधून सहकार्य, शिस्त आणि कुटुंबातील एकोप्याचे संस्कार नकळत रुजत गेले.

गणपतीच्या आगमनानंतर गौरीचे स्वागत मोठ्या उत्साहात केले जायचे. घराघरांत स्त्रिया गौरीची मनोभावे पूजा करून कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि ऐश्वर्यासाठी प्रार्थना करत. दोन-तीन दिवसांच्या या उत्सवानंतर भावपूर्ण वातावरणात गौरीचे विसर्जन केले जायचे आणि पुढील वर्षी पुन्हा तिच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहिली जायची.

आज काळ खूप बदलला आहे. तंत्रज्ञानाने जीवन अधिक सोयिस्कर केलं आहे. सजावटीसाठी रेडिमेड साहित्य, एलईडी लाइट्स, डिजिटल देखावे आणि ऑनलाइन खरेदी सहज उपलब्ध झाली आहे. अनेक ठिकाणी पारंपरिक आरतीऐवजी संगीत प्रणालीवर आरतीचा ट्रॅक लावला जातो (व्यक्तिश: मला ते तितकंसं पटत नाही पण असो.). सोशल मीडियामुळे बाप्पाचे फोटो, सजावट आणि आरती क्षणात जगभर पोहोचतात. परदेशात राहणारे नातेवाईकही व्हिडिओ कॉलवर आरतीत सहभागी होतात. बदल स्वीकारणं आवश्यक आहे, पण त्या सोबत प्रत्यक्ष एकत्र बसून आरती म्हणण्याचा आनंद आणि आपलेपणा जपणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात वेळ कमी झाला असला, तरी गणेशोत्सव अजूनही कुटुंबाला एकत्र आणण्याचं निमित्त ठरतो. काही गोष्टी बदलल्या असतील, पण बाप्पावरील श्रद्धा, मोदकाची चव, आरतीतील भक्ती आणि भेटणाऱ्या माणसांमधला आनंद आजही तसाच आहे.

आणि मग येतो तो भावुक क्षण—विसर्जनाचा. “गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!” या घोषणांनी आसमंत दुमदुमून जातो. ढोल-ताशांचा गजर, लेझीमचा ताल, नाचणारी माणसं आणि डोळ्यांत दाटलेला विरह—हे सगळं एकाच वेळी अनुभवायला मिळतं. बाप्पाला निरोप देताना

मनात थोडी हुरहूर असते, पण त्याचबरोबर पुढच्या वर्षी तो पुन्हा येणार, ही आशाही असते. म्हणूनच विसर्जन हा शेवट नसतो; ती पुढच्या गणेशोत्सवाच्या सुंदर प्रतीक्षेची सुरुवात असते.

गणेशोत्सवाने मला केवळ धार्मिक संस्कार दिले नाहीत, तर माणसं जोडायला शिकवलं, एकत्र साजरा करण्याचा आनंद दिला आणि आयुष्यभरासाठी असंख्य आठवणी दिल्या. आजही जेव्हा गणेशोत्सव जवळ येतो, तेव्हा मन पुन्हा त्या बालपणीच्या पुणे आणि सोलापूरच्या गल्लीबोळांत फिरून येतं.

बदलत्या काळात स्वरूप बदललं असेल, पण गणरायाविषयीचं प्रेम, भक्ती आणि "पुढच्या वर्षी लवकर या" ही मनापासूनची हाक कधीच बदलणार नाही.कारण गणेशोत्सव कधीच संपत नाही. तो विसर्जनानंतरही मनात राहतो—उदबत्तीच्या सुगंधासारखा, आरतीच्या स्वरांसारखा, आजीच्या आवाजासारखा आणि बालपणाच्या त्या निरागस दिवसांसारखा. बदलत्या काळात परंपरांचं रूप बदलत राहील, तंत्रज्ञान आणखी पुढे जाईल, जीवन अधिक वेगवान होईल; पण गणरायाबरोबर जुळलेलं हे भावविश्व, या आठवणींचा अवीट गंध आणि पुन्हा एकदा त्याच्या आगमनाची लागलेली ओढ... ही मात्र कधीच बदलणार नाही.

|| गणपती बाप्पा मोरया , मंगलमूर्ती मोरया ||



विक्रांत सतीश वैद्य

# आठवणीतला गणेशोत्सव



**ग**णपती बाप्पा मोरया!! ह्या गजराने मन जसे भारावून जाते, तसे आठवणीतही रमून जाते. माझ्या माहेरचा गणपती हा अनंत चतुर्दशीपर्यंतचा तर सासरचा गौरीबरोबर जाणारा. आईकडे गणपतीबरोबर महालक्ष्मीचं आगमन पण आणि त्यात आम्ही तीन माहेरवाशिणी. तिघी जणी आपली आपली नोकरीची कसरत सांभाळत आईच्या मदतीला जात असू. खूप छान दिवस असायचे ते. आनंदात, उत्साहात कसे जायचे ते कळायचे देखील नाही. आई साधारण पंधरा दिवस आधी तयारीला लागायची. गणपतीसाठी पंचखाद्य, साखर-खोबरे, तांदूळ पिठी ह्या गोष्टींची जमवाजमव सुरू व्हायची. आदल्या दिवशीच आम्ही गणपतीची मूर्ती आणायचो पण त्या दिवशी तोंड बघायचे नाही, म्हणून मग रुमालाने झाकून ठेवायचे. पुण्यामध्ये आम्ही जरा शहराबाहेर राहत असल्याने ही केलेली सोय होती. मग सकाळी आरती करून वाजत गाजत मूर्तीचे आगमन व्हायचे. सोसायटीतील सगळ्याच घरांची जणू हीच पद्धत होती. गणपती बसणार त्या दिवशीची साग्रसंगीत पूजा आमचे वडील करायचे. दहा दिवस दोन्ही वेळा आरती मग खिरापत छान मजा यायची. आमच्या तिघींची एक-एक करून लग्न झाल्यावर आमचे नवरे आणि हळू हळू मुलेही त्यात सहभागी व्हायची. ह्या गणपतीच्या आगमनाची आम्ही खरंच आतुरतेने वाट बघायचो. माझ्या मोठ्या दोन्ही बहिणींकडे, त्यांच्या घरीही गणपती बसायचे. त्यांचं सगळं सांभाळून त्या यायच्या, आता सध्या माझ्या आईचा गणपती माझा भाचाच त्यांच्या गणपतीबरोबर बसवतो.

माझ्या सासरचा गणपती मात्र आमच्या मोठ्या काकांकडे बसतो. त्यामुळे मी थोडी निवांत कारण दर वर्षी पुण्याहून बेळगावला गणपतीसाठी सुट्टी काढून जाणं काही जमायचं नाही. मग धमाल करायची ती आईकडेच. त्यातही खास गोष्ट अशी, की माझे सासरचे मोठे गणपती देऊळ पण आहे बेळगावला. आमच्या देवळातपण गणपतीमध्ये एक छोटी मूर्ती वेगळी आणून त्याची प्रतिष्ठापना केली जाते. गणेश चतुर्थीला आणि त्या मूर्तीचे विसर्जन मात्र गौरीबरोबर नाही, तर अनंत चतुर्दशीला केले जाते. त्या मूर्तीचे वैशिष्ट्य असे की ती मूर्ती पिढ्यान पिढ्या ठरलेल्या कुंभाराच्या घरामधूनच बनवून येते आणि एकाच पद्धतीत बनवली जाते.

स्वत:चे देऊळ असल्याने आमच्यासाठी गणपती आगमन ही खूपच खास असते. खाजगी असलेल्या आमच्या देवळाचे गणपती उत्सवाचे काही वेगळे नियम, चालीरीती आहेत.
एकूणच आम्हां सगळ्यांसाठीच गणपती हा सण फारच वेगळा असतो. खाण्यापिण्याची रेलचेल, उकडीचे मोदक ह्यांची मजा काही औरच आहे.
ह्या सगळ्या गोड, सुंदर आठवणींबरोबरच माझी एक गणपतीमधील कटू आठवणही आहे. लहान असताना पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सव पाहायला जायला मला खूपच आवडायचे. वेगवेगळ्या मंडळांनी केलेले ते हलते देखावे बघताना काय मजा यायची. त्यातही हमखास न चुकता बघायचे, ते देखावे म्हणजे खडकमाळ आळी, हिराबाग, दगडूशेठ असे, एकदा असेच रात्री उशिरा आम्ही देखावे बघून घरी परत येत असताना जवळजवळ एक तास नव्या पुलावर गर्दीत अडकलो होतो. श्वास घ्यायलाही त्रास होत होता. काय करावे सुचतच नव्हते. नुसता देवाचा धावा करत होतो, आपोआपच थोड्या वेळाने मग गर्दी कमी झाली आणि रस्ता रिकामा व्हायला लागला. ह्याचे कारण मात्र कधीच कळले नाही. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातसुद्धा ह्याचा कुठेही उल्लेख देखील नव्हता.

एकंदरीतच पण गणपती आगमन हा खरंच आनंदाचा क्षण तर विसर्जन अगदी मनावर दगड ठेवूनच..



मिताली खासबाग

# आठवणीतला गणेशोत्सव



**बा**प्पाचे मंगलमय आगमन !

श्रावण महिना संपलेला . त्यामुळे बाहेरचा ऊन पावसाचा खेळ पण संपलेला . श्रावणात दर सोमवारी शंकराच्या देवळात होणारी गर्दी पण थोडी ओसरलेली . मंगळागौरीसाठी माहेरी आलेल्या माहेरवाशिणी डोळे पुसत सासरी गेलेल्या ! आमचे घर गावाच्या बाहेर, स्टेशनच्या पलिकडे एका चाळीला लागून होते. गावांत जायचे म्हणजे शेताचे बांध ओलांडून जायला लागायचे.

श्रावण संपला तेव्हा वाट पहायची ती गणरायाच्या आगमनाची ! त्यांच्या आगमनासाठी घराची झाडलोट, रंगरंगोटी व मखराची सजावट !

आमच्याकडे हे सर्व करायला आम्ही दोघी बहिणी आणि आई . दादा, आई दोघेही आता वृद्धत्वाकडे झुकलेले व इतर भाऊ लग्न होऊन बाहेरगावी गेलेले . पण आईचा व माझा अुत्साह दांडगा ! गणपतीच्या निमित्ताने सगळे घरी येणार तेव्हां घर अगदी स्वच्छ दिसले पाहिजे म्हणून आम्ही स्वच्छतेची मोहीम काढली . घरांत चारी खोल्यात मातीच्या जमिनी आणि बाहेरच्या पडवीत फरशी . एक दिवस आम्ही दोघींनी गणपती जिथे ठेवणार ती खोली व देवाची नेहमीची खोली , भिंती झाडून , जमिनी लाल मातीने सारवून काढल्या . आता राहिली फक्त पडवी ! तिच्या भिंती रंगवायचे ठरवले ! दादांना विचारले असते, तर कधीच संमती मिळाली नसती . म्हणून दुपारी ते बाहेर गेल्यावर हे काम करायचे ठरवले ! आईचा ब्रश म्हणजे जुन्या एका केरसुणीचे शेष राहिलेले एक थोटूक आणि माझ्या हातांत कधीकाळच्या जुन्या ब्रशचा राहिलेला एक अवशेष ! पांढरा चुन्याचा रंग ! दुसरा रंग आणायची शामत नव्हती . दादांच्या नजरेतून ते सुटले नसते . सर्व लपाछपीचा कारभार !

सर्व आयुधे तयार होती ! गावांतजायचे म्हणजे शेताच्या बांध्यावरून , स्टेशन ओलांडून पुढे जायला जरा वेळ लागायचा. बांध्याच्या दोन्ही बाजूंची शेते पाण्याने पूर्ण भरलेली होती व त्यामध्ये सहा इंचापर्यंत वर आलेली भाताची रोपे डुलत असायची. दादा बांध ओलांडून जरा पुढे गेल्यावर आम्ही इकडे आमचे काम सुरु केले. पडवीला फक्त एकाच बाजूला भिंत व पुढच्या बाजूला कठडा . त्यामुळे ती एक भिंत पूर्ण करायला दोघीनां वेळ लागला नाही. त्यानंतर खालची फरशी धुऊन काढणे, दादांची पुस्तके टेबल खुर्ची जाग्यावर ठेवणे इ. कामे ते यायच्या आंत झाली. पुढे गणपतीसाठी माझा डॉक्टर भाऊ घरी आल्यावर "घर अगदी स्वच्छ दिसतेय " म्हणून पाठ थोपटल्यावर सगळ्या कामाचे सार्थक झाले !

झाले, बाप्पाच्या आगमनाचा दिवस उजाडला ! त्याच्या बैठकीला छोटा पाट पण लाल ऑईल कलरने रंगवून तयार ठेवलेला होता. धाकट्या भावाने गांवात जाऊन दत्तूकाकांच्या दुकानातून बाप्पाला आणले. पडवीच्या पहिल्या पायरीवर आल्यावर त्याने "गणपती बाप्पा मोरया " अशी घोषणा केली . त्यावेळी मोठ्या वहिनी व आईची स्वयंपाकघरात गडबड सुरू झाली. " अगबाई , गणपती आले वाटतं ! " मग दोघींनी घाईघाईने नथी घातल्या व गणपतीला आरती करायला त्या लगबगीने पुढे आल्या.

त्या नंतरचे पाच दिवस धमालच धमाल. दररोज सकाळी जेवायला काहीतरी गोड . पहिल्या दिवशी आईच्या हातचे मस्त उकडीचे मोदक. गौरीच्या दिवशी वरणा-पुरणाचा स्वयंपाक . रोज रात्री मोठी आरती. अगदी सुख:कर्ता दुख:हर्तापासून आरती ज्ञानराजा पर्यंत! माझ्या धाकट्या भाचीची ती खास शिफारस असायची. शेजारपाजारची सर्व मुलंमुली आरतीला यायचे . प्रसाद बहुधा साखरमिश्रित सुक्या खोबऱ्याचा पण नशीब जर अगदीच बलवत्तर असेल तर पहिल्या दिवशी रात्री मुंबईहून आलेल्या भावाने जर पेढे आणले असतील तर त्याचा नैवेद्य दाखवला जायचा. लाल रंगाच्या त्या छोट्या चौकोनी खोक्यातले ते छोटे छोटे पिवळे पेढे अगदी लोभसवाणे दिसायचे ! मुलांची संख्या कमी असेल तर सर्वांना अख्खा पेढा मिळायचा नाहीतर अर्ध्या पेढ्यावर समाधान मानायचे ! असे पाच दिवस गडबडीचे, आनंदाचे व मजेचे जायचे. मग बाप्पाच्या विसर्जनाचा दिवस! दहीभाताची शिदोरी घेऊन बाप्पा त्यांच्या घरी जायचा व त्या बरोबर चार- पाचदिवसांसाठी आलेली सर्व मंडळी पण ! घर अगदी सुने सुने होऊन जायचे .

पण त्या वेळेस प्रत्येक दिवशी मिळलेला तो आनंद न विरघळणारा होता.

आता ते घर गेले , ती चाळ गेली ! त्या वेळी तिथे राहणारे बहुतेक लोक इतकेच काय तर माझे आई दादापण दिवंगत झाले ! तरीपण " गणपती बाप्पा मोरया " हे परवलीचे शब्द ऐकले कीं मन १२००० मैलांच्या प्रवास करून , शेताच्या बांध्यावरून चालत त्या चाळीत जाते आणि मग आठवतात त्या आरत्या, ते आईच्या हातचे मोदकाचे जेवण ! मग त्या मंगलमय दिवसांची आठवण होऊन मन भावुक होऊन जाते !



अुमा दिघे

# आठवणीतला गणेशोत्सव



**ग**णपती गौरीच्या निमित्ताने तुडुंब प्रसाद हादडल्यानंतर आठवलेली कविता.

पूर्वी मी दहा पैशांत भविष्य बघण्यासाठी वजन बघत असे, पुढे भविष्य पहायला सुद्धा एक रुपया लागू लागला.

पण वजनाच्या काट्यावर उभे राहणे, हे इतके अंगावर काटा आणणारे असू शकते, हे मला चाळिशीनंतर समजले.

पूर्वी ज्योतिषामुळे मला वजन पाहण्याचा नाद लागला होता, चाळिशीनंतर वजनामुळे माझा ज्योतिष बघण्याचा नाद सुटला.

लाडू, चकली, जिलेबी, काजूकतली, पोळी, भात असे अगदी जिवाभावाचे सोबती, आतून आपल्या एवढ्या वाईटावर असतात, हे मला चाळिशीनंतरच समजले.

मी हतबल झालो, व्याकुळ झालो, दु:खी झालो आणि अनाहूतपणे माझ्या तोंडातून पाडगांवकरांची कविता स्त्रवली.

आता तोंडातून काही स्त्रवणे हे सुद्धा पाप वाटू लागले आहे किंबहुना भूक लागणे हेच पापाचे लक्षण वाटू लागले आहे.

अशा व्याकुळ अंत:करणातून स्त्रवलेल्या त्या ओळींनी कपडे जरी पाडगांवकरांनी शिवलेले घातले होते, तरी त्यातील व्याकुळता कितीतरी अधिक होती.

पाडगांवकरांच्या, डोळ्यामधले आसू पुसतील ओठांवरले गाणे, या मूळ कवितेपेक्षाही जास्त व्याकुळता आणि आर्तता आमच्या या विडंबनात आहे, असा आमचा विनम्र दावा आहे.

कधी पापडी कधी रबडी, परंतु दोन्ही एक आवडी।
अंगावरची जाडी सांगे खाण्यामधली गोडी।।

ध्यास तुंद ढेरीचा घ्यावा,
हळूच एक उपवास धरावा,
आणि अचानक फिरुन ठरावी हटकून ओली पार्टी।

अंगावरची जाडी सांगे खाण्यामधली गोडी।।

सूर्यास्ताला खाऊनी घ्यावे
सकाळचेही सूत्र जमावे
नव्वदीला गरकन स्थिरावे नंतर वजनी काटे

अंगावरची जाडी सांगे खाण्यामधली गोडी।।

उगीच पळण्या लागुनी नादी
गरम गादी कुणी सोडिली
आता सांगे आर्त कहाणी गुडघे केविलवाणे

अंगावरची जाडी सांगे खाण्यामधली गोडी।।

पचली प्रथिने योगही जमले
नयनी सुडौल गीत तरळले
व्याकुळ गुडघे तुंदिल ढेरी स्मरून आता खाणे

अंगावरची जाडी सांगे खाण्यामधली गोडी।।



विनय भालेराव

# आठवणीतला गणेशोत्सव



Clouds of yellow and red with flocks of people in white marching by, oblivious to where or why, only focused on one goal: walking down a street. To a 7 year old me that was really all I could comprehend. All I wanted at that point of the sun was to go home, sit, eat, and play. I glanced back n' forth, left n' right looking for two men wearing white hats, shirts, pants and I saw them; except it wasn't them. Two random people I thought, but right behind them I saw my uncle and dad, holding high above the small yet symbolic idol. What was that symbol? A symbol of unity and spirit as summarised from my mom. I catched onto spirit slowly, reflecting on the years of particular traditions and color themes that surrounded me during that time. However, the now 13 year old me still pondered: what unity?

In the US all we really did was build the idol, clean the house, decorate the mandir, and fry some delights. 90% of the time was solely with family, and family, as claimed, is always united. Sure some family-friends may have come every now and then but that also wasn't unity. Honestly the last place I expected to find this 'unity' was through a WhatsApp video call; My aunt, who is always in some chaotic event, called us the moment the September sun's hue completely disappeared. The 14-year old me was in zero condition to observe a truckload of events happening in some street of Pune. The beat of the drums was matching the drool of my eyes. The uproar of hundreds seemed to whisper in my ear. The colors on the screen looked more like my pillow than an event. However, something still kept me awake, overpowering my sleep.

The chattering and yelling of observers, the beating of the drums, the flowing clusters of yellow, red, and white on the screen worked in a certain invoking harmony. I didn't feel like a kid 8,105 miles away from there, I felt present like I was there on the side cheering on. I took the phone closer to my face and glanced at the participants, they didn't seem like random strangers, they seemed like fellow people who were merely celebrating. My aunt yelled into the phone "Look your cousins are participating in Dhol-Tasha!". She flipped the camera to a circle of people in white clothing beating drums. Now I knew my cousins' faces very well and it was definitely concerning to not find them after several glances. Every face was yellow, red, and most noticeably–happy.

My aunt held the phone above the crowd giving me a slightly more aerial view. The street diverged into three, the people numbered in hundreds, and the cloud of color covered acres. As I traced the circle of white in which my cousins were supposed to be, I expected there to be collisions at some point, after all there was so much chaos. I watched and waited, anxious yet aspiring. By this point my sleep was non-existent and my head was bobbing up n' down to the rhythm of the drums. That white circle, which had like 50 people minimum, fit perfectly into the narrow street which barely held a two-lane road. The circle kept moving, and the crowd behind didn't pause too. I realized at that moment that this unity wasn't about achievement, destination, or even organization. It was, very unexpected to the definition-abiding me, a collection of people celebrating their culture as a whole. Not individually by posting stories, not with family through rituals, not with the known neighborhood by a party. Just a bunch of 'random' rag-tag people who came together, decided to bring everyone else together, and march down a street–together.



*Ayush Sheth*

# आठवणीतला गणेशोत्सव



**पु**णे.... विद्येचे माहेरघर . पुणे तिथे काय उणे हे तर आपण ऐकतोच, पण पुण्यातील गणेशोत्सव हा एक वेगळाच विषय आहे. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला हा गणेशोत्सव फक्त सार्वजनिक नाही, तर घरोघरी केला जाणारा. कोणाकडे अर्धा दिवस, दीड दिवस , पाच दिवस तर कोणाकडे दहा दिवस. श्रावण संपत आला, की लगेचच सगळीकडे गणेश मूर्ती, डेकोरेशनचे सामान , महिरपी दिसू लागतात पण त्याच बरोबर मोठ्या हौसेने गौरींचे मुखवटे, साड्या आणि दागिनेही बाजारपेठा व्यापून टाकतात.

काय घेऊ आणि काय नको ह्या विचारातच भरपूर खरेदी केली जाते आणि डेकोरेशनची तयारी सुरू होते. दोन दिवस आधीच घरात महिरपी सजतात, फुलांच्या माळा, हार , गजरे ह्यांच्या ऑर्डर्स दिल्या जातात.गुरुजींना विचारून पूजेची वेळ ठरवली जाते आणि मोदकाची तयारी सुरू होते. आदल्या दिवशी संध्याकाळी घरोघरी मूर्ती आणल्या जातात आणि औक्षण करून बाप्पा घरात येतात.अतिशय घाई गडबडीत दोन दिवस निघून जातात आणि most awaited दिवस उजाडतो.

सकाळीच दारात रांगोळी काढली जाते आणि गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. सगळे नातेवाईक एकत्र येऊन पूजा, गणपती स्तोत्र , अथर्वशीर्ष पठण करून मोदकांचा आस्वाद घेतात आणि संध्याकाळी आरती करून प्रसाद वाटला जातो .आपल्या घरातली पूजा आटोपून शेजारी जाऊन आरती आणि प्रसाद घेतलाच जातो. आणि हे सगळे झाल्यावर सोसायटी किंवा कॉलनीमधल्या गणपतीच्या दर्शनाला जाऊन, गप्पा मारता मारता दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाचे प्लॅनिंग करून पहिला दिवस संपतो. दुसऱ्या दिवशी चमचा लिंबू, ड्रॉईंग, तीन पायांची शर्यत अशा लहान मुलांच्या competitions पार पडतात आणि वेध लागतात ते गौरींचे.

घरोघरी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने "गौर कशा पायी आली , सोन्या रुप्या पायी आली " असे म्हणत गौरींचे स्वागत केले जाते. गौर ही घरची लेक आहे असे समजून रात्री भाजी भाकरी आणि कढी खिचडीचा नैवेद्य दाखवला जातो. अशातच रांगोळी, कुकिंग आणि गौरी सजावट स्पर्धा सुरू होते. गौरी पूजनाच्या दिवशी गौरींचे पूजन करून पुरणपोळी, कमीतकमी दोन भाज्या, दोन कोशिंबिरी, कढी, आमटी, भजी, वरणभात असा नैवेद्य दाखवला जातो . आवर्जून सवाष्णींना जेवायला बोलावून ओटी भरली जाते. संध्याकाळी हळदी कुंकू केले जाते. माहेरी जाऊन गौरीचे दर्शन घेऊन, जेवण करून, ओटी भरून मुली आपल्या घरी परत येतात.

आणि मग मात्र सगळे जण गौरी गणपती विसर्जनाची तयारी करू लागतात. डाळ आणि खिरापत, खीर आणि कानोला करून नैवेद्य दाखवला जातो आणि गणपती बाप्पा मोरया , पुढच्या वर्षी लवकर या ह्या गजरात विसर्जन केले जाते आणि घरातील गणेशोत्सवाची सांगता होते. सोसायटीमधला विविध गुणदर्शन आणि प्राईज डिस्ट्रिब्युशन कार्यक्रम पार पडतो आणि पुढच्या दिवशी सत्यनारायण पूजा करून ढोल ताशाच्या गजरात बाप्पांचे विसर्जन होते. तरीही अजून गणेशोत्सवाची सांगता खऱ्या अर्थाने होत नाही.

आता सगळे जण मानाचे पाच गणपती आणि देखावे बघायला बाहेर पडतात . रात्री दिव्यांच्या प्रकाशात, देखावे पाहून, बाप्पाचे दर्शन घेऊन मन तृप्त होते. अखेरीस गणपती विसर्जनाच्या दिवशी विसर्जन मिरवणूक बघण्यासाठी लोक रस्त्यांवर गर्दी करतात आणि ढोल ताशा, lighting, देखावे बघतानाच पहाट होते आणि खऱ्या अर्थाने गणेशोत्सवाची सांगता होते. आतापर्यंत भरलेलं घर रिकामं होतं,आणि बाप्पांची

अनुपस्थिती जाणवू लागते पण डेली सोपमधला गणेशोत्सव बघतच दिवाळी येऊन ठेपते आणि गणेशोत्सव पार पडतो.

अमेरिकेतही गणेशोत्सव अगदी उत्साहाने साजरा केला जातो. मित्रमैत्रिणी, शेजारी एकत्र येऊन पूजा करून महाप्रसाद घेतात. देवळातही गणेशोत्सव अगदी छान साजरा केला जातो. घराघरात उत्साहाचे वातावरण असते. या निमित्ताने यथासांग पूजा, नैवेद्य केला जातो. हार, फुले, दुर्वा आणून भक्तिभावाने पूजन केले जाते, पण मन मात्र अजूनही लहानपणच्या गणेशोत्सवातच रमते आणि दरवर्षी पुन्हा नव्याने लहान होऊन गणपती बाप्पाची वाट बघते.

धन्यवाद !



धनश्री कुलकर्णी

# आठवणीतला गणेशोत्सव



**ग**णेशोत्सव आला, की आठवणी येतात  नकळत मनाला माहेरी नेतात...
माहेरचे ते घर 'विरंगुळा' नाव, नावासारखाच त्याचा आनंदी स्वभाव
घराभोवतीचे अंगण मैफिलींनी फुलायचे,
आपसूकच लोक त्याला 'कलांगण' म्हणायचे,
घरी आम्ही चौघे आईबाबा, बहीण नि मी
पण कधी ना भासायची, माणसांची कमी
सोन्यासारख्या माणसांशी, जडलेली नाती
दाराबाहेर भरपूर चपला, हीच होती श्रीमंती
सोन्यासारख्या माणसांमधला, एक बावनकशी हिरा
मनामध्ये कायम असतो, मंदामावशीचा चेहरा
मंदामावशी आयुष्यात यावी, हा बाप्पाचाच कौल होता
ती म्हणजे जगण्याचा, मूर्तीमंत डौल होता
झाले असे,
बाप्पाच्या आगमनाची, सुरू होती तयारी
मखर, सजावट करावी म्हणून, आई गेली बाजारी
एकाच दुकानात दोघींचीही, झाली तिथे भेट
बाळमैत्रिणी दोघीजणी, ओळख पटली थेट
आनंदात आईनं, ओळख करून दिली
त्या दिवसापासून ती आमची, मंदा मावशी झाली!
सजावट कलाकुसरीत, आई आमची हौशी
आता तर तिला,भेटली मंदा मावशी
खरं तर मंदामावशी रंगांमध्ये रमायची
कॅनव्हास आणि कुंचल्याची,भाषा तिला जमायची.



आमची मंदामावशी

थर्माकोलच्या तावावरून,सहज फिरायचे तिचे हात
प्रतिसृष्टीच अवतरायची, अवघ्या काही क्षणांत!
आमच्या बाप्पासाठी तिने, सजावटीचा घेतला ध्यास
आणि काय सांगू मंडळी, तब्बल चाळीस वर्षे चालला,
हा सजावटीचा प्रवास! दरवर्षी देखावे नवे
डोंगर, झाडे, पक्ष्यांचे थवे.. रथ, मंदिरे, इमारती
प्रसिद्ध ठिकाणांच्या प्रतिकृती ....
तेव्हा कुठे यू ट्यूब आणि AI असायचे?
फोटोकडे बघत बघत कल्पकतेला तासायचे.
नोकरी, बदली, आजारपणं, कशामुळेच अडले नाही
उत्साह आणि मैत्रीचे,असे उदाहरण घडले नाही.
तेव्हा आम्ही लिंबूटिंबू,आमची लुडबुड चालायची.
न कंटाळता ती आम्हाला, छोटी कामं सांगायची.
कापता चिटकवतानाच्या,मजेदार गमती जमती
आठवून आजही, हसतो आम्ही किती!
त्या दिवसांनी काय दिले, शब्दांत कसे सांगावं
वाटतं प्रत्येकाला असं, बालपण मिळावं.!

एवढीच नव्हती मावशी, अजून बरीच आहे उरलेली
प्रत्येक वळणावरती आमची, रोल मॉडेल ठरलेली
लांबसडक वेणी आणि, करकरीत कडक साडी
'उंबरठा' तली स्मिता पाटीलच, वाटायची थोडी!
स्वाभिमानी बाणा, तरीही हळवी फार
कित्येकांच्या आयुष्याला, तिचाच आधार!
पृथ्वीवरच्या प्रत्येकाला, प्रेमानेच बघायची
येणारा प्रत्येक क्षण, मनापासून जगायची..!
डोंगर दऱ्या जंगलांसाठी, होती अक्षरशः वेडी
तिनेच लावली आम्हाला, ट्रेकिंगची गोडी
हिमालयात चालायला, कित्येकदा जायची
'शेवटी तिथेच घर बाधीन', आली की म्हणायची..!



आम्ही दोघी बहीणी आणि
मंदामावशी

आता हिमालय म्हटला, की तिची आठवण येते
तिनेच काढलेल्या चित्रातल्या घराकडे नेते..
तिच्यामुळेच कळत गेली, अमृता- साहिरची कविता
सिडनी शेल्डन, अगाथाच्या रहस्यमय कथा.
चार्ली चॅप्लिन सुद्धा ती आमच्यासोबत बघायची
हसऱ्या चेहऱ्यामागचे दुःख मात्र एकटीच जगायची..!

तिचं घर म्हणजे,
रंग आणि पुस्तकांचा लोभसवाणा पसारा
जणू प्रत्येकीच्या मनातला, एक 'चौथा कमरा' ..!
तिच्या हातच्यासारखी कॉफी, जगात कुठेच मिळत नाही
तशा गप्पा तसा बंध,आता कुठेच जुळत नाही.
मंदामावशी म्हणजे, अखंड आनंदाची गाथा
कॅन्सरलाही समोर बसवून, ऐकवायची कविता
आता गणेशोत्सव आला,की आम्ही डोळे पुसतो
मखरातला बाप्पा मात्र, गालातल्या गालात हसतो
म्हणतो, मुलींनो बघा, तुमच्याच अवती भवती
जिथे जिथे आनंद, तिथे दिसेल ती..!
कॅनव्हासवरच्या रंगांत, ती तुम्हाला दिसेल
रानावनातल्या वाटेवरती, तिची सोबत भासेल..!
रांगोळीच्या रेषांमधून, हसणारी ती,
आकाशदिव्यात दिवा होऊन, बसणारी ती!
तुमच्यासोबत पुस्तकात, हरपणारी ती,
कॉफीच्या घोटांसोबत, मनात झिरपणारी ती!
जिथे कल्पनेला पंख आणि मोकळे आकाश आहे
तिथे तिथे समजून घ्या, तिचा अखंड वास आहे..!
बाप्पाचे ऐकून आम्हीही, आता डोळे पुसत हसतो
प्रत्येकात थोडी थोडी, मंदा मावशी शोधतो...!



शिल्पा देशपांडे




## बाबू, बाळ, आणि बाला!

**आ**ज खूप दिवसांनी बाबू आणि बाळ, चहा-कॉफी पीत निवांत बसले होते. म्हणजे बाळ कॉफी आणि बाबू चहा पीत होता. समोर मस्त बर्फाच्छादित डोंगरांच्या रांगा, बाल्कनीत तीन खुर्च्या टाकून ते निवांत बसले होते. कसली घाई नाही, कामांची लिस्ट नाही, नोकरांनी कामं केली की नाही, याची धास्ती नाही, फोन नाही, टेक्स्ट मेसेजेस, व्हॉइस मेल काही काही नाही. अगदी निवांत. बाबूने तर त्याची सर्व मालमत्तासुद्धा बायकोच्या नावावर केली होती, अगदी स्वतःच्या सख्ख्या भावाला न दिलेला गावच्या जागेचा वाटा सुद्धा. त्यामुळे आता नो टेन्शन. तब्येत सुद्धा दोघांची बरी वाटत होती आता. नाही तर मध्यंतरी एकदम वर-खाली झाली होती, अगदी आभाळाला सुद्धा स्पर्श करून आले होते दोघे.

एकाच वाडीत ते रहायचे. बाळ बाबूपेक्षा मोठा होता पण जमायचं त्यांचं मस्त. काही वर्षांपूर्वी बाळने जागा बदलली, तेव्हा मग काही दिवस काही कॉन्टॅक्टच नाही झाला दोघांमध्ये, पण आता बाबूपण आल्याने बोलणं, गप्पा सुरु झाल्या होत्या. बाळला दोन मुलगे तर बाबूला दोन्ही मुलीच. दोघांमध्ये बाळ समजूतदार तर बाबू मस्तीखोर, त्याचे प्रश्न तर कधी संपायचेच नाहीत. बाळला माणसं जोडायची आवड, तर बाबूला पैसे कमवायची. मुंबईतलं दादर म्हणजे बाळचं संपूर्ण जग, तर बाबूला देश-विदेश फिरायची हौस. बाळ कायम नोकरीत तर बाबूने मोठठं हॉटेल उभारलेलं, ते सुद्धा मुंबईत, स्वतःचा बिझनेस. बाळला कायमच बाबूचा अभिमान वाटायचा तर बाबूला बाळबद्दल आदर.

आता नवीन ठिकाणी, म्हणजे स्वर्गात आल्यावरही, शांतपणे चहा प्यायचा सोडून बाबूची चुळबुळ सुरूच. जणू काही तो काहीतरी शोधत होता आणि ते त्याला मिळतच नव्हतं. गोष्टी समोर आहेत पण दिसत नाहीत, असं काहीसं झालं होतं त्याचं.
'अरे, काय शोधतोयस?', बाळने विचारलं.
'माझ्या दृष्टीला काहीतरी झालंय बहुतेक, काही दिसतच नाही.' बाबू म्हणाला.
'अरे असं कसं, तुझा चष्मा लावलास का? तुला माहिती आहे ना टेकनॉलॉजी किती पुढे गेली आहे ते.' बाळचा प्रश्न.
'हो लावला ना, पण मला नाही दिसत काही. अगदी फक्त एक दोन मिणमिणते दिवे.'

‘काय करू आता? इथे आल्यापासून मी सगळ्यांनाच खूप मिस करतोय, राधिका, मिहिका काय करत असतील? त्यांचा आत्ता मेसेज येईल, नवीन कोचची बॅग आली आहे, मला हवी आहे, नाही तर नवीन मॅक हवाय, ऍपलने, नवीन मॉडेल आणलं असेल का?’ बाबू म्हणाला.

बाळ विचारात पडला, म्हणजे हा अजून मनाने इथे आलाच नाहीये, फक्त शरीराने. हे कसं चालेल? त्याला आधीही किती वेळा हे समजवायचा प्रयत्न केला, तरी त्याच्या मनाची काही तयारी झालेली दिसत नाही. आता फक्त बालाच त्याला मदत करू शकेल. मनात फक्त बालाचा विचार आला आणि ती तेवढ्यात तिथे आलीच. तिचा आवडता आलं-मधाचा चहा घेऊन.

बाबूने तिच्याकडे बघितलं आणि त्याच्या तोंडातून आलं, ‘नमस्कार बाला, कशी आहेस गं?’ ‘एकदम मजेत!’ बाला म्हणाली. बाबूची आणि बालाची भेटच नव्हती झाली. ‘इथे सुद्धा ती सगळ्यांना मदत करत बसली असणार, म्हणून अजून भेटली नाही मला.’, बाबूच्या मनात विचार आला.

‘आता तूच मला मदत कर, माझ्या या चष्म्यातून तर मला काहीच दिसत नाहीये.’ बाबूने तक्रार केली.
‘ओ, आपण एकमेकांचे चष्मे नाही वापरू शकत, बाबू, पण इथल्या क्रिस्टल बॉलमध्ये काही दिसतं का ते पाहू या.’ बाला म्हणाली.
‘काहीतरीच काय?’ बाबूने अविश्वास दर्शवला. ‘तू माझी ताकद बघच. हा ऍक्सेस तर बाळला पण नाही.’ बाला हसली.

तिने त्याचा हात धरला आणि ती एका मोठ्या हॉलमध्ये त्याला घेऊन गेली. बाळही त्यांच्या मागोमाग गेला. हॉलच्या मधोमध एक मोठ्ठा गोल होता, पृथ्वी-गोल, तो चक्राकार फिरत होता. त्या गोलावरच एक आरसा होता. ‘या आरशात बघ, मग तुला जे काही तुझ्या चष्म्याने दिसत नाही ना, ते दिसेल. तू फक्त त्या व्यक्तीचं नाव मोठ्याने बोल, मग पृथ्वीगोलावर ती व्यक्ती जिथे असेल तिथला दिवा लागेल आणि तुला तिला बघता येईल. हां आणि माझा हात सोडू नकोस म्हणजे मलाही दिसेल आणि तुला काही मदत लागली तर करता येईल.’ बालाने सांगितलं.

बाबूने आरशात बघितल्यावर, त्याला पृथ्वी-गोलावरचे दोन-तीन दिवे मिणमिणताना दिसले.

‘अरे वा, इथली टेकनॉलॉजी तर फारच पुढे गेली आहे.’. बाबू म्हणाला. ‘मला माझी मोठी मुलगी, मिहिका, हिला बघायला आवडेल, जिच्या पदवीदान समारंभासाठी, मी बरं नसतानासुद्धा अमेरिकेला गेलो होतो.’ त्या पृथ्वी गोलावर काहीच नाही झालं. ‘बरं मग माझी धाकटी मुलगी राधिका, जी अगदी हक्काने मला ‘लेटेस्ट आयफोन हवा, मॅक हवा’ सांगायची आणि मी सुद्धा माझ्या परदेश वारीतून घेऊन यायचो.’ बाबू म्हणाला. तरी सुद्धा काहीच नाही झालं. ‘मला माझ्या बायकोला बघायचंय, जिला मी माझी सर्व संपत्ती, मालमत्ता, हॉटेल, सारं काही नावावर करून दिलं’ तरी सुद्धा काहीच नाही झालं. बाबूने नंतर बऱ्याच जणांची नावं घेतली, मित्र, मैत्रिणी, ज्यांना त्याने इतक्या पार्ट्या दिल्या होत्या, हॉटेलमधले कर्मचारी ज्यांना नोकरी दिली होती, पण जैसे थे. कोणताच दिवा लागत नव्हता. पण एक हिरव्या रंगाचे ठिपके मुंबईत, साताऱ्याला, अलिबागला दिसू लागले होते.

‘बाला, काय होतंय गं? हा आरसा किंवा गोल बिघडला तर नाही ना? तू बघ आरशात आणि मला सांग’, बाबू म्हणाला. बालाने आरशात बघितलं आणि काय चमत्कार, खूप सारे दिवे लकाकताना दिसू लागले. आणि ते हिरवे ठिपके गायब झाले.
‘असं कसं? बाळ, तू बघ.’ बाबू म्हणाला. परत तेच. बाला इतके नाहीत, पण खूप दिवे चमकायला लागले. हिरव्या ठिपक्यांचा मागमूसही नव्हता.
बाबू चकितच झाला, म्हणजे टेकनॉलॉजी तर चालतेय मग मलाच का नाही दिसत.

बालाचा चेहरा मात्र निर्विकार बनला होता. बाबूला जरी त्या पृथ्वीगोलावर काही दिसत नसलं, तरी त्याला का दिसत नव्हतं, हे मात्र तिला माहीत होतं. आणि ती जितकं बाबूला ओळखत होती त्यावरून तो हा प्रश्न तिला विचारणार याचीही तिला खात्री होती. बाबूने बालाकडे बघितलं, तिच्या चेहऱ्याकडे बघून, त्याला कळलं की तिला काहीतरी माहीत आहे, जे त्याला माहीत नाही.

त्याने विचारलं, ‘बाला, माझ्याच बाबतीत असं का होतंय? मला त्यांच्याकडे जायचंय, कितीचीही गाडी, ट्रेन काहीही चालेल मला पण मला दादरला जायचंय’
बाला म्हणाली ‘तुला कळलं तर वाईटच वाटेल आणि आता आपण काही करू नाही शकत रे. आता ते आपलं घर नाही, हे आपलं घर आहे. तुला फक्त त्याच व्यक्ती दिसतील ज्यांच्या मनात तू आहेस किंवा तुझी आठवण म्हणून तुझा फोटो त्यांनी ठेवलाय. बाकी कोणीही नाही. आणि हो, ते हिरवे ठिपके म्हणजे तू त्यांच्यासाठी सोडलेला पैसा.’

बाबूच्या लक्षात यायला लागलं, की काहीतरी वेगळंच झालंय.
‘म्हणजे माझ्याच बायको-मुलींच्या मी मनातच काय पण कुठेही नाही. लाजेखातर एक फोटो पण नाही माझा, माझ्याच घरी? हे कसं शक्य आहे? माझ्या मित्र-मैत्रिणी, कर्मचारी कोणालाही मी त्यांच्यासाठी केलेलं काहीही आठवत नाही?’
‘नाही, बाबू’ बाला म्हणाली. ‘तू त्यांच्यासाठी पैसा कमावलास, त्यांना पैसा दिलास, पण तू त्यांच्यासाठी वेळ नाही दिलास, त्यांना कधी आनंद नाही दिलास, त्यांना घरं दिलीस पण त्यांच्या मनात घर नाही केलंस. आणि म्हणूनच ते जे हिरवे ठिपके दिसतायत ना, तो तू त्यांच्यासाठी ठेवलेला पैसा, तोच फक्त तुला दिसणार कारण तुझा परिवार सुद्धा तो पैसाच उपभोगतोय पण तू आता त्यांच्या खिजगणतीतसुद्धा नाहीस.’

‘बाला, मग ते दोन-तीन दिवे कोणाचे आहेत?’ बाबूने विचारलं.
बाला हसली, ‘अरे, एक तुझा भाऊ, राजेश, ज्याला तू, कधी एका पैश्याची मदत केली नाहीस तो. शेवटी तू त्याचा मोठा भाऊ, म्हणून त्याच्या घरी आई-बाबांबरोबर तुझा फोटो आहे. दुसरे दोघे, तुझ्या हॉटेलमधले कर्मचारी, जे तुझ्याबरोबर पहिल्या दिवसापासून हॉटेलमध्ये जॉईन झाले होते. तू गेल्यावर, त्यांनी हॉटेल सोडलं पण तू त्यांच्या मनात नेहमीच आहेस.’

बाबू कोसळलाच. त्याच्या मागे जे काही झालं होतं त्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. माझा एक पासपोर्ट आकाराचा फोटोसुद्धा माझ्याच बायको, मुलींना, मी गेल्यावर ठेवावासा वाटत नाही, पण माझा पैसा मात्र चालतो? मग का मी माझं सारं आयुष्य पैशाच्या मागे घालवलं, मी

कितीतरी जणांना याच पैशाने मदत करू शकलो असतो पण मी स्वार्थी झालो. मी कितीतरी आनंदाच्या क्षणांना मात्र मुकलो आणि माझ्या परिवारालापण गमावून बसलो.

स्वर्गात कोणी कोणाचं नसतं, सगळे सारखेच. कधी कोणी रडत नाही, फक्त आनंदी-आनंद पण आज मात्र बाला आणि बाळ दोघांच्याही डोळ्यात अश्रू होते, त्यांचा लाडका मुलगा, बाबू, त्यांना भेटायला खूप लवकर, अवघ्या पन्नासाव्या वर्षी, स्वर्गात आला म्हणून नाही पण तो जेव्हा पृथ्वीवर होता तेव्हाच जीवन जगला नाही म्हणून. का आपण पृथ्वीवर असताना निरर्थक गोष्टींच्या मागे वेळ घालवतो आणि मग एकदा कुडीतून प्राण गेल्यावर हे शहाणपण सुचतं, मानवी जीवनाची ही व्यथाच नाही का?



रत्नांगी मालपेकर

## लेख

### एक तरी ओवी अनुभवावी

# ज्ञानेश्वरीतील ओंकाररूपी श्रीगणेश

**ग**णेशोत्सव म्हणजे आनंदाचा, भक्तीचा आणि उत्साहाचा सण. बाप्पाच्या आगमनाने घराघरात चैतन्य सळसळते. आपण सगळेच गणपतीची सगुण रूपात - सोंड, मोठे पोट, हातात मोदक अशा रूपात - पूजा करतो. पण महाराष्ट्राचे लाडके संत ज्ञानेश्वर माऊली जेव्हा 'ज्ञानेश्वरी'ची सुरुवात करतात, तेव्हा ते कोणत्या गणपतीला नमस्कार करतात? माऊलींचा गणेश हा केवळ एक पौराणिक देव नाही, तर तो साक्षात 'ज्ञान' आणि 'ओंकार' आहे. गणेशोत्सवाच्या या पवित्र पर्वावर 'एक तरी ओवी अनुभवावी' या लेखमालेत आपण ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील श्रीगणेशाचे हे अत्यंत सुंदर आणि आगळेवेगळे वर्णन अनुभवू या.

माऊली म्हणतात -
देवा तूचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी॥

हे देवा, तूच गणेश आहेस. सर्व विषयांचा, सर्व अर्थांचा प्रकाश करणारा, म्हणजे बुद्धी देणारा, तूच आहेस - असे निवृत्तीनाथांचे दास ज्ञानेश्वर म्हणतात आणि माझ्याकडे लक्ष द्यावे, अशी विनंती करतात.

येथे ज्ञानेश्वर महाराज कोणत्याही मूर्तीची पूजा करत नाहीत, तर 'बुद्धीच्या प्रकाशका'ची पूजा करत आहेत. जगात जे काही ज्ञान आहे, जो काही अर्थ दडलेला आहे, तो समजून घेण्याची शक्ती बुद्धीमध्येच असते. माणूस प्रत्येक गोष्ट आधी बुद्धीने समजून घेतो आणि मगच कृतीत आणतो - आणि त्या बुद्धीचा मूळ स्रोत म्हणजेच गणेश. आपल्या आत दडलेल्या अज्ञानाचा अंधार दूर करून जो ज्ञानाचा प्रकाश देतो, तोच खरा गणेश. एखादी कठीण गोष्ट अचानक उमगते, आत जो ज्ञानाचा झरा फुटतो, तोच क्षण म्हणजे गणपतीचे खरे दर्शन.

पुढे माऊली गणेशाच्या रूपाचे वर्णन अतिशय अद्भुत पद्धतीने करतात. सगुण रूपाला ते थेट निर्गुण ओंकाराशी जोडून टाकतात -

अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारे ।।
हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।
मिया श्रीगुरुकृपा नमिले । आदितीर्थासी ।।

'अ' कार हे तुझे दोन पाय, 'उ' कार हे तुझे विशाल उदर आणि 'म' कार हे तुझे विशाल मस्तक. हे तिन्ही एकत्र येतात तेव्हा 'ॐ' तयार होतो, आणि त्या ठिकाणी संपूर्ण शब्दब्रह्म - वेदांचे आणि ज्ञानाचे मूळ तत्त्व - सामावलेले असते. त्या आदितत्त्वाला मी माझ्या गुरूंच्या कृपेने नमस्कार करतो, असे माऊली सांगतात.

गणपतीच्या संपूर्ण शरीराचीच माऊलींनी 'ॐ' या पवित्र नादाशी सांगड घातली आहे. दोन पाय म्हणजे अकार - सृष्टीचा आणि ज्ञानाचा आरंभ. विशाल उदर म्हणजे उकार - या पोटात जणू संपूर्ण ब्रह्मांड आणि सर्व विद्या सामावलेल्या आहेत. आणि मोठे मस्तक म्हणजे मकार - विशाल बुद्धीचे आणि ज्ञानाचे प्रतीक. हे तीनही एकत्र उच्चारले की 'ॐ' हा नाद तयार होतो, आणि हा ओंकारच प्रत्यक्ष गणेश आहे, असे माऊली म्हणतात. गणपती म्हणजे विश्वाचा मूळ नाद आहे - नादब्रह्म, शब्दब्रह्म. जगातील सगळे ज्ञान, किंबहुना सगळे अस्तित्वच, याच एका ओंकारातून जन्माला आले आहे.

माऊली गणेशाला 'सकलार्थमतिप्रकाशु' का म्हणतात, हे नीट उमगण्यासाठी महाभारतातील एक सुंदर कथा पाहावी.

महर्षी व्यासांनी जेव्हा 'महाभारत' हा महाग्रंथ रचण्याचे ठरवले, तेव्हा त्यांच्यासमोर एक मोठी अडचण उभी राहिली. लाखो श्लोक होते, आणि ते वेगाने सांगायचे होते - पण एवढ्या वेगाने लिहून घेणार कोण? तेव्हा त्यांनी श्रीगणेशाची प्रार्थना केली. गणेश प्रकट झाले, पण त्यांनी एक अट घातली - "मी लिहायला सुरुवात करेन, पण माझी लेखणी क्षणभरही थांबणार नाही. तुम्हाला न थांबता श्लोक सांगावे लागतील." व्यास मुनी अत्यंत हुशार होते. त्यांनी लगेच प्रति-अट घातली - "हे गणेशा, तूही कोणताही श्लोक त्याचा संपूर्ण अर्थ समजून घेतल्याशिवाय लिहून घ्यायचा नाहीस." गणेशाने हसून होकार दिला.

मग व्यास मुद्दाम मध्येच एखादा अतिशय कठीण आणि गूढ श्लोक सांगत. तो ऐकल्यावर गणेशाला त्याचा अर्थ उलगडायला काही क्षण लागत, आणि नेमक्या त्याच वेळात व्यास पुढचे अनेक श्लोक मनातल्या मनात रचून तयार ठेवत! अशा प्रकारे दोघांचीही अट पाळली गेली आणि महाभारत लिहिले गेले. आणि विशेष म्हणजे, आज जगभर ज्याचा अत्यंत आदराने अभ्यास केला जातो ती श्रीमद्भगवद्गीता ही याच महाभारताचा एक भाग आहे — म्हणजे गणेशाच्या याच लेखणीतून गीतेसारखा अलौकिक ग्रंथही अवतरला.

या कथेचे मर्म एवढेच, की गणेशाची बुद्धी इतकी अफाट होती, की व्यासांच्या अत्यंत गहन तत्त्वज्ञानाचा अर्थही त्यांना क्षणार्धात उमगत असे, आणि त्याच बुद्धीच्या बळावर त्यांनी व्यासांच्या लोकोद्धाराच्या कार्याला हातभार लावला. जो शब्दांच्या पलीकडचा 'अर्थ' प्रकाशित करतो, तोच गणेश. माऊलींनी 'सकलार्थमतिप्रकाशु' हा शब्द वापरून व्यासांच्या याच गणेशाला वंदन केले आहे.

चला तर, या गणेशोत्सवात आपणही आपल्या आतल्या ज्ञानाच्या गणेशाला जागृत करू या.
गणपती बाप्पा मोरया!



श्रीदत्त राऊत, शिकागो

## माशीची भ्रमणगाथा

**आ**ज रविवार, निवांत व्यतीत करण्याचा दिवस. मी सकाळचा घड्याळाचा गजर बंद करून कुशीवर वळून झोपलो परत. आज काही विशेष काम नाही. उन्हाळा जवळ आला, की सुट्टीची चाहूल लागते. आमच्या शिकागोत तर गरम वातावरण हे दुर्लभ. जसा मे महिना जवळ येतो, तसे सृष्टिसौंदर्य खुलते. मी आरामात उठलो. सकाळचे नित्यक्रम उरकून ऑफिसला जायला निघालो. हवा त्वचेला गुदगुल्या करत होती. A/C ची गरज भासत नव्हती. गाडीत माझ्या अत्तराचा सुगंध दरवळत होता. मी गाणे गुणगुणत होतो. समोर सिग्नल लाल होताना दिसला. गाडी मी हळुवार चालवत नेली. आजूबाजूला थंडीने काढता पाय घेतल्याने निसर्ग आपले डोके उमलणाऱ्या हिरवळीच्या रूपात बाहेर काढत होते. पक्षी किलबिल करत आकाश आपलेसे करण्यात गुंतले होते. मी पण थंडीत मागे सारलेले प्रकल्प या हंगामात पूर्ण करण्याच्या विचारधारेत पोहत होतो तेवढ्यात गुं गुं च्या ध्वनिलहरी माझ्या कानातून थेट मेंदूत प्रसारण पावल्या. माझे पोहणे मी थांबवले आणि त्या आवाजाच्या कर्त्याचा शोध घेतला. माझी नजर गाडीच्या काचेवर बाहेरून एक भ्रमण करणाऱ्या माशीवर स्थिरावली.

माशी गुं गुं गुं करत माझ्या गाडीच्या काचेवर टोचे देत होती. मी हळूच पुटपुटलो,
" अगं माशी , तू अशी कशी? भोळी भाबडी? अगं, त्या काचेवर तू कितीही डोकं आपटलं तरी तुला आत येता येणार नाही. नको तू हा त्रास करून घेऊस" पण ती कुठली ऐकते माझं? मी पण शांत बसलो.काही क्षण गेले आणि कदाचित त्या माशीने तोच निष्कर्ष काढला असावा. ती पण एका जागी काचेवर स्थिरावली. गाड्यांची रहदारी सुरू झाली. मी म्हणालो, " माशी ताई तुमची vacation संपली. तुम्ही जावे आपल्या घरा आम्ही जातो आमुच्या मार्गे. राणी, इथून पुढे माझा वेग तुला तुझ्या आप्तबांधवां पासून दूर नेईल. उड जा रे." पण ती माशी काही केल्या हलेना. मागून गाडीचा हॉर्न ऐकून मी माझी गाडी गतिमान केली.

माशीने पण माझ्याबरोबर थोडा सांगाती रूपात प्रवास करायचे ठरवले असावे. ती पण काचेवर स्थिरस्थावर झाली. सांगाती माशी समोरून येणाऱ्या वाऱ्याशी झुंज देत होती. एक क्षण तिने पंख उघडले, मला वाटले उडते आता ती, पण तसं काही घडले नाही. दमलेल्या तिच्या पंखरूपी पदांना कदाचित थोडा गारवा मिळाला असावा. ताप हा सर्व जीवांना लागू असावा. जीवन कोणतेही असो, संग्राम प्रत्येकास लागू आहे. काय व्यथा असाव्यात तिच्या?

का गं माशी, तुला आपले घर सोडून जावेसे का वाटले? तू माझ्याबरोबर खूप लांबवर आलीस. मागे तुझे आप्त बंधू सर्व तुला miss करणार नाहीत का? तू त्यांना सोडलंस, की त्यांनी तुला सोडलं? प्रभू श्रीराम पण वनवासात गेले होते. त्यांच्या सावत्र आईने आपल्या वासनेने लोपून जाऊन त्यांना घराबाहेर काढले होते. तुला तसे अनुभव आहेत का? त्यांनी सर्व जीवन प्रसंगांना सामोरे जाऊन विजय प्राप्त केला होता. घरी परत आले तेव्हा त्यांचा राज्याभिषेक केला व आजपर्यंत आम्ही रामराज्याचे उदाहरण देतो. अर्थात त्यांनी ज्यास जे योग्य त्यास तसा न्याय केला होता.

जीवन आले, की त्रिविध ताप आलेच. ते तिघे तिळी भावंडं. एकत्र येतात आणि जातात. कोणता पहिले आला आणि कोणता शेवटी गेला हे आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. प्रभू श्रीराम ह्यांना आधिभौतिक ताप पहिले अनुभवास आला. त्यांचे आप्त बांधव त्यांना ताप देऊन गेले. त्या भौतिक म्हणजे आजूबाजूला असणाऱ्या व्यक्ती किंवा वल्लींनी आपला स्वार्थ साधण्यासाठी केलेल्या योजनांनी क्षणिक का होईना, पण साफल्य पाहिले. त्या भौतिक तापातून निर्माण झालेला वनवास हा आधिदैविक तापाने व्यापला. वन आले की निसर्गाशी झुंज आली. कडक ऊन, धारदार पाऊस व कडाक्याची थंडी ही त्याबरोबर आलीच. अर्थात संग्राम हा व्यक्तीशी नसून पंचतत्त्वांशी आला. तिथे या तत्त्वांना अनुसरून वर्तन करता आले, म्हणजे विजय प्राप्त झाला. उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात उष्ण पदार्थ सेवन योग्य हे समजले आणि वर्तनात परिवर्तित करता आले, म्हणजे विजय प्राप्त झाला.

पण सर्वात कठीण आहे तो आध्यात्मिक ताप. आत्मिक अर्थात आपल्या मनाशी झुंज. मीच माझी माझ्याच न्यायालयात तर्खडपणे परीक्षा घेतो, तेव्हा हा ताप मला अनुभवता येतो. इथे मी चुकलो हे मान्य करावेच लागते. मीच माझा वकील, मीच अशील, मीच न्यायाधीश. मीच साक्षीदार. माझ्या विचारांच्या पिंजऱ्यात मीच कैदी. स्वतःचे गुन्हे स्वतःशीच कबूल करून या पिंजऱ्यातून सुटका होऊ शकते.
विचारांच्या या मार्गावर अचानक समोरच्या लाल सिग्नलची सीमा लागली. मी विचार करू लागलो, की माशी, तुला कोणता ताप आधी अनुभवायास आला असावा? आपले घर तू दूर सोडलं. नवीन मार्ग निवडल्यास अनेक संकटांना सामोरे जावे लागणार. प्रभू श्रीरामचंद्रांना आपली भार्या व भाऊ यांची साथ होती. कदाचित त्यांच्यासारखे सांगाती त्यांना लाभले त्यामुळे त्रिविध ताप त्यांना सुसह्य झाले. तुझ्याही साथीला प्रभू श्रीरामांसारखे करुणानिधान सुजाण असे सांगाती लाभोत, हीच सदिच्छा तुझ्या प्रति मी प्रार्थितो.

माझी गाडी ऑफिसच्या परिसरात वळली. मी गाडी लावली आणि माशी समोरच्या गुलाबाच्या झाडावर भ्रमण करू लागली. काही काळ मी तिचे भ्रमण कार्य बघण्यात गुंग झालो. तिला नवीन वास्तव्य मिळाल्याचे समाधान माझ्या मनात निर्माण झाले. प्रभू श्रीरामांनी जसे त्रिविध तापांवर विजय मिळवून रामराज्य स्थापन केले तसेच तुझेही होवो, ही अंतरंगी भावना मी तुझ्या प्रति बाळगतो. पुढे कधी योग आला तर परत भेटू. प्रभू श्रीरामचंद्रांची नाव केवटाने पैलतीरावर नेली व प्रभूंच्या मैत्रीस पात्र ठरले, तसेच आपले योग असावे कदाचित.

ll श्री राम जय राम जय जय राम ll

(हा लेख श्री स्वामी समर्थांच्या श्री गुरुलीलामृत मधील तत्त्वबोधावर आधारित आहे. ह्या अध्ययनातून तुमच्या अंतरंगात काही प्रश्न निर्माण झाल्यास मी ते ऐकण्यास उत्सुक असेन. माझे संपर्क स्थान bluelotus.sk@gmail.com किंवा whats App - +१ ३०१-६०५-२५९३ )

मूळ तत्त्वबोध - श्री बाबा उर्फ श्री मंगलनाथ महाराज - मिटमिटा छत्रपती संभाजीनगर
लेखन - सौ. सुलक्षणा कुलकर्णी - वास्तव्य - शिकागो - अमेरिका



सुलक्षणा कुलकर्णी

# कृष्ण साहाय्य

**यु**धिष्ठिर हा शांत व संयमी होता. राज्यासाठी आपापसात लढणे त्याला नको होते. त्यामुळे द्रुपदांनी एका हुशार मित्राला धृतराष्ट्राकडे पाठविले. त्याने पांडवांना त्यांचे राज्य द्यावे असे धृतराष्ट्राला सुचवले. तसे न केल्यास युद्धामध्ये सर्व कौरवांचा नाश होईल, असे सांगितले. त्यामुळे धृतराष्ट्राने पांडवांना अर्धे राज्य देण्याचे कबूल केले, पण दुर्योधनाने ते धुडकावून लावले. सुईच्या अग्रावर मावेल एवढीही जमीन देणार नाही, असा निरोप त्या विप्राबरोबर पाठविला. विदुर, कृष्ण, भीष्म, द्रोण यांनीही धृतराष्ट्राला समजाविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यामुळे आता युद्ध टाळणे शक्य नव्हते. त्यामुळे अर्जुन कृष्णाला साहाय्य मागण्यास गेला, पण त्याच्या आधी दुर्योधन तिथे पोहोचला होता. दोघांनाही राज्य हवे होते.



मी किंवा माझे सर्व पराक्रमी सैनिक एकाला मिळतील पण मी निःशस्त्र असेन व युद्धात लढणार नाही असे कृष्णाने सांगितले. तेव्हा दुर्योधनाने सैन्य मागितले. ते सैन्य एक औक्षहिणी होते. ते मिळाल्यावर दुर्योधन खुश झाला. आता पांडवांचा निश्चितच पराभव आहे, असे त्याला वाटू लागले. कृष्ण आपल्याला मिळणार, म्हणून पार्थला आनंद झाला व आपल्याला सत्याच्या बाजूला साहाय्य करता येणार म्हणून कृष्णाला आनंद झाला

त्यानंतर दुर्योधन त्याचे गुरु बलराम यांच्याकडे सहाय्य मागण्यास केला, परंतु बलरामांनी त्याला नकार दिला पण त्याला आलिंगन व आशीर्वाद दिला. कृष्ण निशस्त्र असतानाही पार्थाने घेतला व तो खुश झाला, म्हणून कृष्ण त्याला तू वेडा आहेस असे म्हणू लागला.

शांत संयमी धर्मराज तो
रणकंदन ते रोधू न शकला
पार्थाते मग पहा धाडिला
कृष्ण साहाय्य ते घेण्याला
दुर्योधन तो प्रथम पोहोचला
त्याच्या मागून पार्थ ही आला
कृष्ण साहाय्य मागू लागले
कृष्णाने ते मान्यही केले
सैन्य सारे द्यावे मजला
दुर्योधन त्या म्हणू लागला
कृष्ण सखा तो पाहा राहिला
पार्थाते मग हर्ष जाहला
दुर्योधनही खुश झाला
बलरामांना पहा भेटला
साहाय्य करण्यास नकार दिधला
अलिंगिले आपुल्या शिष्याला
पार्थाते मग कृष्ण म्हणाला
किती रे वेडा तू पार्था
निशस्त्र असूनही मजला
घेऊन तू रे हर्षित झाला
जगताचा तू पालनकर्ता
आमचा असशील रक्षणकर्ता
तू तर व्हावे पार्थसारथी
यश ते येईल आमुच्या हाती



श्रीमती सुहासिनी येवलेकर

# कविता

रेखी पहाट कोवळी
लाल कुंकुम कपाळी
आली किरणे सोनेरी
दूर नभाची काजळी

आड डोंगराच्या तेज
जणू दिवसाचे बीज
अर्घ्य सुगंधी अर्पून
कळ्या फुलती सहज

दंव हसे पानोपानी
पक्षी विहरी गगनी
उन्ह कवडसे नक्षी
नाचे गर्द रानांतूनी

असा उगवता रवी
वाट प्रकाशाची नवी
आता वठल्या स्वप्नांना
पुन्हा फुटेल पालवी



श्रद्धा भट

## कविता

झुलता झोपाळा श्रावण गातो
आनंद मनाचा त्यातून झरतो
माहेराचे प्रेम गातच रहातो
खळाळत्या हास्याचा आनंद देतो

सृष्टीला रंगांचा प्रसन्न चेहरा
मनात उजळतो श्रावण हासरा
हिरव्या पाचूंचा कैफ लाटांना
आल्हाद उत्सव मग डोळ्यांना

सुस्नात झाडांची रूपे सुंदर
फांद्यावरी झुले हिरवे झुंबर
पाऊस अंगाला गुदगुल्या करी
थोडेसे भिजण्यात आनंद भारी

इंद्रधनूची कमनीय सुंदरी
श्रावण थेंबात रंगत न्यारी
वाटते चढावे कमानीवरी
ढगस्पर्श नेई स्वर्गाचे द्वारी

कमान रंगांची धूसर होई
श्रावणगंमत दावत राही
टपोऱ्या मोत्यांचा क्षणैक पाऊस
लख्ख उन्हाचे अंबर ही हौस

हिरवळीने हरखली गुरे वासरे
शेतेही डुलता प्रसन्न घरे
सृष्टीचा उन्माद प्रपात कोसळे
छोट्या धारांत दूध झऱ्यातून वाहे

मने आनंदती मेंदीने रंगती
हातांचे तळवे सुंदर नटती
नागाची पूजा, दिव्यांची पूजा
रक्षाबंधन, सागराची पूजा

मंगल गौरी शिवाचे पूजन
जिवतीला पूजती मातांची मनं
निसर्ग नटला सणांनी सजला
ऐसा हा श्रावण आनंदे भरला



नीला जोशी

# गुरुपौर्णिमा

**गु**रु तुम्ही अनुग्रहाचा, गुरु तुम्ही सावलीतला,
गुरु संकटमोचना, गुरु आशाकिरणातला,
गुरु तुम्ही ब्रह्मअस्त्र, गुरु तुम्ही ब्रह्ममित्र,
गुरु तुम्ही माझ्यात वसे, बनुनी जीवनाचे चरित्र !

गुरु तुम्ही ज्ञानज्योतीचा, गुरु मार्गदर्शक वाटेवरचा,
गुरु प्रेमसागराचा, गुरु विश्वास नात्यातला,
गुरु तुमच्या कृपेने, उजळे माझे अंतरंग,
तुमच्या चरणी मी अर्पिते, माझा प्रत्येक श्वास संग !!

गुरु तुम्ही माझी प्रेरणा, गुरु तुम्ही माझा आधार,
तुमच्या आशीरसहवासाने, खुलतो जीवनरूपी संसार,
गुरु तुम्ही माझ्या हृदयी, सदैव राहो हा वास,
तुमच्या कृपेने लाभे मला, ज्ञानाचा सुंदर प्रकाश !!



मनीषा गजेंद्रगडकर पंडित

# वृत्तान्त

## गणेशोत्सव २०२६

## साठ वर्षांची बाप्पाची कृपा!

**या** वेळची नवलाई: कोकण थेट शिकागोत

शिकागो महाराष्ट्र मंडळाची एक खासियत आहे. कुणी म्हणतं, “किती छान होईल ना?” आणि मंडळ म्हणतं, “मग करूनच टाकूया!” मराठी माणसाच्या या वाक्यात कल्पना, उत्साह आणि थोडीशी जबाबदारी दुसऱ्याच्या खांद्यावर ठेवण्याची कला—सगळं असतं.

निरभ्र आकाशाखाली नारळाची झाडं, तुळशी वृंदावन, रंगीबेरंगी पोशाख आणि गजबजलेला बाजार पाहून क्षणभर वाटलं—आपण शिकागोत आहोत की कोकणात? फक्त नारळ फोडायला परवानगीपत्र लागतंय की काय, एवढाच फरक! मुलांच्या आनंदी गोंधळाने उत्सवाला अगदी घरची चाहूल दिली.

पस्तीस वर्षं समाजसेवा करणाऱ्या सतीशजींनी गणपती आणि गौरीची पूजा केली. आरती आणि मंत्रपुष्पांजलीच्या वेळी गप्पांचा वेगही मंदावला—हा स्वतःमध्ये एक आध्यात्मिक चमत्कारच! एका कोपऱ्यातून अनिताताई गोडबोले उत्सव पाहत होत्या. हा कदाचित त्यांचा साठावा शिकागो गणेशोत्सव! १९६६ मधला पहिला उत्सव आणि आज आनंदाने नाचणारी मुलं—यांना जोडणारा त्या एक जिवंत दुवा आहेत.

हसू बाई, जोरात!

मुलांचे कार्यक्रम आणि नृत्ये यांनी मन जिंकलं. जेवणाने उरलेलं सगळंच जिंकलं! वरणभात, फणसाची भाजी, मसालेभात, मोदक आणि गुलाबजाम... माझ्या अंतर्मनाने शांततेचा शोध सुरू केला आणि दुसरी वाढ घेतल्यावर तो ताबडतोब संपला. आहारतज्ज्ञांनी हे वाचू नये; किंवा वाचलं तर पुढच्या गणेशोत्सवापर्यंत विसरावं.

मग ‘हसू बाई जोरात’ने पोटभर जेवणानंतरही पोट धरून हसायला लावलं. मुग्धा कुलकर्णी, रेणुका कुलकर्णी, अंजली किर्लोस्कर, अमेय परांजपे आणि चमूने वजन कमी करण्याचा ५१वा संकल्प, रिकामं झालेलं घर आणि मध्यमवयीन गोंधळ यांतून धमाल उभी केली. प्रेक्षकांनाही खेळात सामील केलं. स्वतःच्या सवयी रंगमंचावर दिसल्या की हसू जरा जास्तच येतं—कारण तेव्हा आपण प्रेक्षक नसतो, पुरावा असतो! मराठी माणूस सातासमुद्रापार जाईल; पण डाएट ठरवताना पुढच्या जेवणाची चर्चा सोडणार नाही.

भाईगिरी: मेड इन शिकागो!

“मेक इन अमेरिका”ची चर्चा सर्वत्र आहे; पण आमच्या कलाकारांनी एक पाऊल पुढे टाकलं—पु. लं.वरचं प्रेम मराठी, सादरीकरण मेड इन शिकागो! भाईगिरीने पु. ल. देशपांडे यांच्या विश्वाची सफर घडवली. रश्मी चाफेकर, उल्का नगरकर आणि कलाकारांनी त्यांचा विनोद, संगीत, नाटक, बालपण आणि कौटुंबिक आयुष्य सुंदरपणे गुंफलं.

सुनीताताईंच्या पत्राने मन हळवं झालं; गुळाचा गणपती आणि ती फुलराणीमधील क्षणांनी पु. लं.च्या कल्पनाशक्तीची पुन्हा आठवण करून दिली. निलेश जोशींचं “इंद्रायणी काठी” ऐकताना मन म्हणालं, “आज जाने की जिद ना करो!” पु. लं.च्या सहवासात नव्वद मिनिटं कशी पुरणार? त्यांच्यासोबत वेळही बहुधा तिकीट काढून बसला असावा.

घरी काय घेऊन आलो?

ढोलताशांच्या गजरात “गणपती बाप्पा मोरया!” म्हणत विसर्जनाची वेळ आली. या सोहळ्यामागे मेहनत घेणाऱ्या MMC टीममधील दीपाली सावंत चेतन रेगे, आशिष नगरकर, रत्नांगी मालपेकर पल्लवी पाटील, मनीषा पंडित, प्रीती उंडाळे, अनिकेत सावंत आणि हृषीकेश घोडके, माधव गोगावले, MMC 2026 team , आणि BMM EC उल्का नगरकर यांचे मनापासून आभार.

सर्व कलाकार, भोजन समिती आणि पडद्यामागे धावणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाचेही आभार.

दरवर्षी बाप्पाला निरोप देतो; पण घरी परतताना हात रिकामे नसतात. सोबत असतं हास्य, मैत्री आणि आपल्या मुलांनाही अभिमानाने आपली म्हणता येईल अशी परंपरा. साठ वर्षं झाली, तरी पुढच्या वर्षाची उत्सुकता तितकीच ताजी आहे. फक्त एक प्रश्न कायम आहे—पुढच्या वर्षी मोदक किती खायचे? उत्तर अर्थातच: “बघू... परिस्थितीनुसार!”

गणपती बाप्पा मोरया! पुढच्या वर्षी लवकर या!

“निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे...”






राजीव गोखले

# 'शिकागो'मध्ये रंगले कवी संमेलन

**वि**क्रमी श्रोत्यांच्या उपस्थितीत बुधवार, २२ जुलै २०२६ या दिवशी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या ' 'साहित्यकट्टा' च्या 'बोलका कट्टा' या उपक्रमांतर्गत आयोजित केलेले कवी संमेलन जल्लोषात पार पडले. जागतिक मराठी अकादमीचे संस्थापक व ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे आणि कार्यकारिणी सदस्य राजीव मंत्री, गौरव फुटाणे या मान्यवरांच्या उपस्थितीत व महाराष्ट्रातील विविध भागातील कवींनी संमेलनास खास रंगत आणली.
महाराष्ट्र मंडळ शिकागो 'साहित्यकट्टा' व 'जागतिक मराठी अकादमी' यांच्या संयुक्त विद्यमाने असे कवी संमेलन अमेरिकेत प्रथमच झाले.

कवीसंमेलनाचे सूत्रसंचालक माधव गोगावले यांनी सर्वांचे स्वागत करून महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या काही उपक्रमांबद्दल माहिती दिली. गेली पाच-सहा वर्षे भारत व इतर देशातून खास साहित्यिक आणि कलाकार, मंडळाच्या 'साहित्यकट्टा' व बोलका कट्टा' वर कार्यक्रम सादर करत आहेत. कोविड काळामध्ये २०२१ साली महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षा उल्का नगरकर आणि त्यांच्या कार्यकारिणीने अनेक उपक्रम सुरू केले. आपल्या भारतीय संस्कृतीची व मराठी धर्माची जोपासना करण्यासाठी हे उपक्रम विशेषतः दर आठवड्याला होणारे अध्यात्मपीठ, साहित्यकट्टा, इतिहास मंच यासारखे अनेक कट्टे अजूनही आपल्या संस्कृतीची पुढील पिढीसाठी जोपासना व प्रबोधन करण्यासाठी जोमात चालू आहेत. या वर्षीदेखील मंडळाच्या अध्यक्षा दिपाली सावंत यांच्या सकारात्मक पाठिंब्याने असे कार्यक्रम यशस्वीरीत्या चालू आहेत.

भाषा टिकली तरच आपली संस्कृती टिकते. 'साहित्यकट्टा' मागची उद्दिष्ट्ये प्रामुख्याने अमेरिकेत मराठी भाषेची जोपासना करणे आणि वाचन-लेखनाद्वारे ती वृद्धिंगत करणे, सभासदांच्या मनात मराठी साहित्याविषयी गोडी निर्माण करणे, नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देऊन त्यांना आपल्या साहित्याच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ देणे, ज्यांच्यात साहित्यिक दडला आहे, त्यांना लेखनाला प्रवृत्त करणे आणि अर्थातच उत्तम कार्यक्रम आयोजित करून श्रोत्यांचे मनोरंजन करणे हे आहेत.
संमेलनाचे सहआयोजक जागतिक मराठी अकादमीचे मान्यवर श्री. गौरव फुटाणे यांनी थोडक्यात त्यांच्या संस्थेविषयी माहिती सांगितली. गेली अनेक वर्ष ही संस्था 'शोध मराठी मनाचा' हे संमेलन करत आहे. तरुणांना रोजगार मिळवून देणे, जगातील अनेक देशातील मराठी भाषकांना एकत्र आणून विविध प्रेरणादायी आणि विद्यार्थ्यांसाठी असलेले खास कार्यक्रम ती करत आहे.

श्रद्धा भट, अश्विनी कुंटे व मंजूषा पांडे यांनी मान्यवर कवींचा आणि माधव गोगावले यांनी जागतिक मराठी अकादमी कार्यकारिणीच्या मान्यवरांचा परिचय करून दिल्यानंतर कवितांची रिमझिम सुरू झाली.




श्रद्धा भट यांचे संमेलनाचे निवेदनही कवितांना साजेसे सुंदर होते. हे संमेलन श्रोत्यांना उत्तमोत्तम कविता ऐकण्याची एक पर्वणीच होती. कवी संमेलनाबाबत त्या म्हणाल्या - “कला, साहित्य, काव्य नुसतंच मनाला सुखावतं असं नाही, तर मनाला अधिक व्यापक आणि प्रगल्भ करतं. विविध कवींच्या कवितांमधून वेगवेगळं विश्व आपल्यासमोर उभं राहतं. जीवन त्यांच्या नजरेतून बघता येतं. म्हणूनच कवी संमेलनं महत्वाची असतात. कवींच्या तोंडूनच त्यांची कविता ऐकणे महत्वाचं असतं. कवितेमध्ये व्यक्त झालेल्या भावना थेट हृदयाला भिडतात आणि कवितेतल्या अनुभवाशी समरस करतात.” असाच काहीसा अनुभव श्रोत्यांना या कवी संमेलनातून मिळला.

काही कवींच्या शब्दांमध्ये हलकेच आपल्याला त्यांच्या तरल जगात उचलून नेण्याची ताकद असते. अशी जादू दशरथ परब सरांच्या गेय कवितांमध्ये होती. त्यांच्या कवितांनी कार्यक्रमाचा समा बांधला गेला. त्यांच्या "दूर मी जाऊ कशी" ह्या कवितेतील "पाकळ्यांचे श्वास ओले..." ही ओळ मनाला ओलावा देऊन गेली.

काव्य हे देश, काळ आणि संस्कृती यांच्या चौकटीत फुलतं, त्याचे संदर्भ घेऊनच उलगडत असतं. तरीसुद्धा त्यातल्या अनुभवानं दिलेलं शहाणपण हे देशकालातीत असतं. आता हेच बघा ना, भारतातली स्त्री असो की अमेरिकेतली, कवितेत मांडलेल्या स्त्रीजाणिवा जगाच्या वेगवेगळ्या टोकावर राहणाऱ्या स्त्रियांना सहज जवळ आणू शकतात. या स्त्रीजाणिवा वैश्विक स्तरावरसुद्धा समान आहेत असं जाणवतं. अगदी अशाच स्त्रीजाणिवा अंजली कुलकर्णी यांच्या कवितांमध्ये , विशेषतः 'बदलत गेलेली सही' आणि 'तो ती आणि ते' या कविता मधून ऐकण्यास मिळाल्या. 'सही' ह्या कवितेने तर षटकारच मारला. सही म्हणजे खरोखरच सही होती. सगळ्यांना ती खूप भावली आणि 'तो ती आणि ते' ही कविता खूप हृदयस्पर्शी होती. कविता ऐकतांना अंगावर काटा आला. ही कविता ऐकल्यावर तृतीय पंथीयांकडे पहाण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदलेल. अंतर्मुख करणारी अशी ही कविता होती.

आपल्या सर्वांची आयुष्याशी सामना करतांना हार-जीत चालूच असते. मनात साचलेल्या भावभावनांचा निचरा बरेचदा कवितेमधून होतो. कवींसाठी तर होतोच, पण कधी कधी ऐकणाऱ्या किंवा वाचणाऱ्यासाठीही होतो. कवी हृदयातल्या सल, दुःख, वेदना, आनंद, प्रेम, या भावना तो जेव्हा भवताली बदलणाऱ्या निसर्गाच्या प्रतिमांमधून मांडतो, तेव्हा त्यांची अलगद अनुभूती ऐकणाऱ्याच्याही मनात उलगडते. असाच अनुभव श्रोत्यांना प्रकाश होळकरांच्या 'माझे आभाळ तुला घे, तुझे आभाळ मला' , 'पाणी मागावे नभाला' , 'असे कोणत्या दुःखाचे दिस आले बाई ' या कवितांमधून आला. त्या अंतर्मुख करणाऱ्या कविता होत्या. दुष्काळग्रस्त भागातलं चित्र डोळ्यासमोर उभे राहिले आणि त्यांनी अंगावर काटा आला. लोक तिथे कसं जगत असतील आणि म्हणजे अशा वेळेला काय होत असेल, मातीतल्या निसर्गाच्या त्या कविता अप्रतिम होत्या आणि 'माझे आभाळ तुला घे' ही कविता ऐकताना एखादा तरुण शेतकरी प्रेमात अल्लडपणे शेतात नाचत बागडत गात फिरतोय असेच वाटले. अस्सल मातीतल्या कविता ऐकण्याचा मनमुराद आनंद मिळाला.

माणसाला नातीगोती खूप महत्वाची असतात. नाती आयुष्यात उभं राहण्याची ताकद देतात. त्यातल्या त्यात बाप लेकीचे आणि माय लेकाचे नाते खूप घट्ट आणि तितकेच गोड. कधी कधी तर नाती रक्ताचीच असावी लागतात असेही नाही, मैत्रीचे किंवा आधार देणारे नाते सापडले तर ते सुद्धा तेवढेच खरे. असाच नात्यातला गोडवा आणि मिळणारा आधार श्रोत्यांना कवी रमजान मुल्ला यांच्या 'साक्षात्कार ', 'मुलगी म्हणजे गूज बोलते' या कवितेतून अनुभवास आला. वडील आणि मुलीचं नाजूक नात्याचे सुंदर शब्दांकन केले या कवितेत केले होते. ती ऐकताना प्रत्येक मुलीच्याच काय, पण इथे उपस्थित अनेक श्रोत्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

आपल्या आयुष्यात मार्ग काढतांना आलेल्या शहाणपणाचा अर्क ज्यात उतरला जातो ती म्हणजे गझल. गझला प्रत्येकाच्याच मनाला भिडतात आणि आपल्याशा वाटतात. त्याला कारण म्हणजे लयबद्ध पण सहज ओघवत्या शब्दांमध्ये आयुष्याने शिकवलेल्या अनुभवांचा सच्चेपणा त्यात ठासून भरलेला असतो. गझलमध्ये गुंफलेला एकेक शेर कवीचा व्यक्तिगत अनुभव असतो. त्याचबरोबर ऐकणाऱ्याला कुठल्यातरी वैश्विक सत्याचा अनुभव देतो. कवी गोपाळ मापारी यांनी आपल्या - ' पुण्याने शिवले ना मग, पापाने शिवले होते '. ' किनारे, चंद्र, तारे, नभ, नद्या, ढग दाखवत असतो '. 'हृदय भेदल्यावरही, पाणी लागत नाही '. गझलांतून आपलं अनुभवविश्व चित्रित केलं.

आयुष्याकडे गंभीरपणेही पाहता येतं आणि मिष्कीलपणेही. मिश्कीलपणे पाहिलं, स्वतः वर हसत पाहिलं, तर सगळे दुःख, सगळ्या खंती निवळतातच. मिश्कील दृष्टिकोन त्यांवर मलम लावण्याचे काम करतो. कवी इंद्रजित घुले यांच्या 'लग्नातलं जेवण ' या कवितेने प्रेक्षकांमध्येहास्याचे फवारे उडवले. काही वेळा झपाट्याने बदलत जाणाऱ्या जगाकडे बघत जुन्या विसरत चाललेल्या साध्या साध्या सुंदर गोष्टी लयाला जाताना पाहून हळहळ वाटते आणि ती कवितेमध्ये हताश, अगतिक उपहासाचे रूप घेऊन व्यक्त होते, तेव्हा जास्त मनाला भिडते. 'शिल्लक आहेत अजून रंग', ' प्रॉपर्टीच्या नोंदीसाठी' या कवितेतून श्रोतांनी अनुभवले. त्यामुळे सुंदर हलक्या फुलक्या वातावरणाने कविता वाचन कार्यक्रमाची समर्पक अशी सांगता झाली.

कवी संमेलनाच्या शेवटी सौ.अलका वठारकर यांनी या कवी संमेलनाचा सारांश गोड शब्दांकित केलेली शीघ्रकविता श्रोत्यांचे आकर्षण ठरले.
अश्विनी कुंटे यांनी कवी संमेलनाचा समारोप अतिशय सुंदर शब्दांनी केला.

दशरथ परब यांनी पणजी, गोवा येथे गेल्या जानेवारी महिन्यात झालेल्या 'शोध मराठी मनाचा' या जागतिक मराठी अकादमीच्या कार्यक्रमाबद्दल व गोव्यातील प्रसिद्ध कवींविषयी थोडक्यात माहिती सांगितली.

जागतिक मराठी अकादमीचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य राजू मंत्री यांनी आभार मानताना म्हणाले -
“नमस्कार मित्रांनो, सर्वात पहिले आभार ज्या तंत्रज्ञानामुळे आपण सर्व वेगवेगळ्या देशातून आणि भारतातील सर्व वेगवेगळ्या प्रांतातून एकत्र आलो आहोत,आणि सकाळी सकाळी मराठी भाषेतल्या कविता ऐकत आहोत, त्या तंत्रज्ञानाचे आहेत. दुसरं म्हणजे मराठी भाषेमुळे आपल्याला सर्व जगातील लोकांना एकत्र आणून ही सकाळ आनंदी झालेली आहे. त्याचप्रमाणे यात सर्व सहभागी झालेले लोक आणि सर्व कवींचे मी आभार मानतो, कारण पहिल्यांदाच जागतिक मराठी अकादमीने असा एक प्रयत्न केला आहे आणि हा योग जुळवून आणल्याबद्दल श्री. माधव गोगावले यांचे मी विशेष आभार मानतो. अशाच प्रकारचे कार्यक्रम आपण वेळोवेळी करत राहू. आमची सकाळ व तिकडची संध्याकाळ तुम्ही खूप सुंदर खुलवली. धन्यवाद.”

मंजूषा पांडे यांनी या कार्यक्रमाचे सुंदर आकर्षक परिपत्रक केले.
महाराष्ट्र मंडळ शिकागो यांच्या वतीने मंजूषा पांडे यांनी आभार प्रदर्शन केले.
प्रियेश देशपांडे यांनी झूम व मंडळाच्या थेट प्रक्षेपण (Live YouTube) युट्युब या तांत्रिक बाबींसाठी मोलाची मदत केली.
कवी संमेलनाची सांगता ज्येष्ठ कवी आणि जागतिक मराठी अकादमीचे संस्थापक मा. श्री. रामदास फुटाणे यांच्या तरुणांसाठी प्रेरणादायी असणाऱ्या शब्दांनी झाली.

धन्यवाद,
महाराष्ट्र मंडळ शिकागो - २०२६ साहित्यकट्टा आयोजक चमू



माधव गोगावले

# शब्दकोडे



उभे शब्द

१. मोठे आयुष्य लाभलेला
२. पाठीच्या बाजूच्या दारात
३. डोक्यावर हे बांधतात
५ दारावरील वक्राकार भागावरती
६. झाडाखाली
७. आदेश
८ तबल्याचा एक ताल
१२. शहरात प्रवेश करण्याचे ठिकाण
१३. दिवाळीत दारात लावलेला छोटा दिवा
१४. एकशे पंचवीस
१५. प्रचंड
१६. प्रात:काल
२१. चतुर्दशीला याचा वध झाला
२३. निवृत्ती
२४. शहराचा प्रमुख
२५. दिवाळीच्या फराळातील एक मुख्य पदार्थ
२६. देवासमोर लावलेले दिवे
२७. पदाची जबाबदारी
३१. ताल, ठेका

आडवे शब्द

१. देवळापुढे दिवे लावण्यासाठी बांधलेला मनोरा, दिव्यांची रांग
४. अचानक
७. दिवाळीत हे उडवतात
९. दोघांनी मिळून गायलेले गाणे
१०. दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध नट
११. कमतरता
१३. हे दगडाला लावल्यास त्याचे सोने होते
१५. मनासारखे न होणे
१७. गजाननाचे भक्त
१८. आसपास फिरणारा
१९. लाकडाची लांब दांडी
२०. त्रिशतक
२२. टारगट
२५. अंमली पदार्थ
२८. अपाय घडविणारे
२९. महापूजेनंतर वाटला जातो
३०. सहज
३२. शोक
३३. कर्ण असा होता



संकलन - अभिजित रायरीकर

# षडयंत्र

**ष**डयंत्र हा शब्द अलीकडे वर्तमानपत्रात सारखा वाचायला मिळतो.अतिरेकी म्हणा, नक्षलवादी म्हणा किंवा कुख्यात टोळीयुद्धवाले गुंड म्हणा शासनाविरुद्ध षडयंत्र रचीत असतात आणि शासन त्यांचा बिमोड करण्याच्या प्रयत्नात असते.

तुमच्या लक्षात आलेच असेल, की 'षडयंत्र' म्हणजे घातक कृत्याची योजना; ज्यामुळे एखाद्याचा पाडाव होईल, खूप नुकसान होईल किंवा जीवितहानी होईल, अशा घातपाती कृत्याचा पद्धतशीर आराखडा करणे म्हणजे षडयंत्र रचणं. षडयंत्र म्हणजे एखाद्याचे नुकसान व्हावे, त्याला त्रास व्हावा म्हणून हेतुपूर्वक तयार केलेली योजना.

तुम्ही मला नक्कीच विचाराल, की 'अर्थ कळला पण षडयंत्र हा शब्द तयार तरी कसा झाला?' तुमचा प्रश्न बरोबरच आहे. या शब्दात 'षट्' आणि 'यंत्र' ही दोन पदे आहेत. 'षट्' म्हणजे सहा. मुळातले पद षट् असे आहे. पुढे यंत्र शब्द आल्याने 'षट्' चं उच्चारण 'षड्' असे झाले. यांपैकी 'यंत्र'चा अर्थ इथे मुळात जादू किंवा जादूविद्या असा आहे. जादूविद्येचा काळी जादू (ब्लॅक मॅजिक) म्हणून एक प्रकार आहे. दुसऱ्याला त्रास देण्यासाठी, दुसऱ्याचे नुकसान करण्यासाठी, घात करण्यासाठी, नाश करण्यासाठी 'काळी जादू' वापरली जाते. या जादू विद्येतच १) जारण (वेड लागावे, रोग व्हावा किंवा मृत्यू यावा यासाठी केलेला मंत्रप्रयोग) २) मारण ३) उच्चाटन ४)मोहन ५) स्तंभन (गतिरोध किंवा अटकाव करणे) आणि ६) विध्वंसन अशी षट्कर्म म्हणजे सहा प्रकारचे मंत्रयोग सांगितलेले आहेत. हे सहा प्रकारचे मंत्रयोग करणे म्हणजे षडयंत्र रचणे. जादू विद्येतील हा शब्दप्रयोग पुढे मग कोणत्याही प्रकारच्या विध्वंसक किंवा विनाशक कृतीच्या विचारासाठी वापरण्यात येऊ लागला. 'षडयंत्र' हा शब्द आपल्या वाचण्या-ऐकण्यात येतो खरा; पण हा शब्द जर तुम्ही मराठी शब्दकोशात शोधू जाल, तर सापडणारच नाही. हा शब्द संस्कृत भाषेच्या कोशातही दिसत नाही. मात्र हिंदीच्या साध्या कोशातही आढळतो. याचा अर्थ हा शब्द हिंदी भाषेतून (बहुतेक वर्तमानपत्राच्या माध्यमातून) हळूच कधीतरी मराठी भाषेत येऊन दाखल झाला आहे. परभाषेतले शब्द आपल्या भाषेत कधी येतात, कसे रुळतात ते बऱ्याचदा कळतच नाही.



**डॉ. द. दि. पुंडे**

# बोधप्रश्नोत्तरी

(परमपूज्य श्री. मंगेशदादा फडके हे कॅलिफोर्निया येथे वास्तव्यास असून प.पू. श्रीकृष्ण दत्तात्रय देशमुख उपाख्य प. पू. डॉक्टरकाका यांचे कृपांकित शिष्य आहेत व त्यांच्याच कृपेने आज स्वतः सद्गुरुपदी विराजमान आहेत. सद्गुरूंच्या कार्यासाठी आपल्या यशस्वी व्यावसायिक कारकीर्दीतून निवृत्ती घेऊन अनेक पारमार्थिक कार्यक्रमाचे आयोजन, विविध आध्यात्मिक विषयांवरील निरूपणे व प्रवचनांच्या माध्यमातून ते सातत्याने प्रबोधन करीत असतात. त्यांच्या निरूपणाचा लाभ अध्यात्मपीठावरील श्रोते घेतच असतात; पण त्यांच्या या अध्यात्मविषयक सदरातून आपल्या अनेक प्रश्नांचेही निरसन होईल अशी आमची खात्री आहे - संपादक)

।। श्री गणेशाय नमः ।।

मागील अंकापासून ‘बोधप्रश्नोत्तरी’ या लेखमालिकेचा शुभारंभ झाला. शास्त्रप्रणीत म्हणजे वेदांतशास्त्राच्या आधारे व संतप्रणीत म्हणजे संतांच्या उपदेशाच्या आधारे, परमार्थाविषयी मूलभूत संकल्पना आपण समजून घेणार आहोत. साधकाच्या प्रामाणिक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची ईश्वरीय व्यवस्था असते. ईशकृपेचे ते एक स्वरूप आहे. ‘रचना’ संकल्पित ही लेखमालिका त्याचाच एक भाग आहे अशी आमची प्रामाणिक श्रद्धा आहे.

प्रश्न २) अध्यात्मशास्त्राने वर्णिलेले 'सत्' तत्त्व व आधुनिक विज्ञान जगताच्या ज्या मूलतत्त्वाचा शोध घेत आहे, ते एकच का ?

उत्तर - भारतीय अध्यात्मशास्त्राच्या प्रतिपादनानुसार, या अनंत ब्रह्मांडाच्या दृश्य पसाऱ्याच्या आत व बाहेर भरून राहिलेले 'सत्' नावाचे तत्त्व आहे. ते त्रिकालाबाधित (तीनही काळात अबाधित) असून जगताच्या निरपेक्ष, अनादी, अनंत व अपार असे सर्वत्र व्यापून आहे. त्याच तत्त्वाच्या अधिष्ठानावर हे दृश्य जगत भासते, अनुभवाला येते!

हे एकमेवाद्वितीय असलेले तत्त्व सर्व जीवांच्या अंतःकरणात व्यापून आहे व त्याचा प्रत्यक्ष म्हणजे अपरोक्ष अनुभव हा त्या तत्त्वाशी एकरूप होऊनच येणे शक्य आहे. (सः अहम्।)

आधुनिक अस्सल वैज्ञानिक याच मूलतत्त्वाचा त्यांच्या पद्धतीने शोध घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. एका सूक्ष्माला (subatomic particle) गवसणी घातल्यावर त्याही पुढे आणखी काही अधिक सूक्ष्म असल्याची स्पष्ट जाणीव त्यांना आहे. त्यामुळे हा कल्पनाविलास नसून ते सत्यान्वेषण (सत्याचे अन्वेषण म्हणजे शोध) आहे, research आहे. अणूच्या nucleus मधील proton/neutron व त्या भोवतीच्या पोकळीत फिरणारे electron. त्याच्याही पुढे अतिसूक्ष्म quarks, leptons, bosons इत्यादी. यांचे (zoo of particles) वर्गीकरण करण्याचा कंटाळा आलेला एक शास्त्रज्ञ म्हणतो, हेच काम करायचे असते तर मी जीवशास्त्रज्ञ झालो असतो!

सत्याचे अन्वेषण करतांना वैज्ञानिकांच्या असे लक्षात आले आहे, की अन्वेषणाचा (शोधाचा) विषय व अन्वेषण करणारा असे दोघे परस्परांहून वेगळे राहिले, तर सूक्ष्मातिसूक्ष्म असलेल्या दृश्य घटकांचे सर्वांगीण निरीक्षण एकदम होऊ शकत नाही. एक करावे, तर दुसरे निरीक्षण निसटते व दोन्ही करून पाहावीत, तर दोन्हींचे अर्धवट ज्ञान होते.
या संदर्भात Quantum Entanglement चा प्रयोग चिन्तनीय ठरावा.

Quantum Entanglement - It is the phenomenon that occurs, when a group of particles is generated, interacts, or shares spatial proximity in a way such that the quantum state of each particle of that group can not be described independently of the state of the others (such as spin or polarization), including when the particles are separated by a large distance.

यावर आधारित २०२२ चे भौतिकशास्त्राचे Nobel Prize ज्या त्रिकुटाला मिळाले (John Clauser, Alain Aspect आणि Anton Zeilinger) त्यांच्या संशोधनाचा विषय होता - The Universe Is Not Locally Real.

Real ~ Objects have definite properties independent of observation
Local ~ Objects can be influenced only by their surroundings, and any influence cannot travel faster than the speed of light.
त्यांनी काढलेला निष्कर्ष - These things cannot both be true! Evidence shows that objects are not influenced solely by their surroundings, and they may also lack definite properties prior to measurement (observation).
थोडक्यात, निरीक्षण करणारा हा निरीक्षणात स्वतःला विसरल्याशिवाय त्याला अन्वेषण करताच येत नाही. (to become a participator not an observer).
हीच समस्या Neuroscience ला consciousness च्या बाबतीत भेडसावते.

वैज्ञानिक व वेदान्ती यांच्या सत्यान्वेषणातील फरक सांगताना Fritjof Capra म्हणतो - "ऋषी ध्यानमार्गाने सत्याचा शोध घेतात तर अणुवैज्ञानिक प्रयोग व गृहीत कृत्यांच्या (hypothesis) आधाराने त्याचा वेध घेऊ पाहतात. ऋषींना सत्य उमगते पण त्याच्या व्यक्त शाखोपशाखा कळत नाही. वैज्ञानिकांना व्यक्त शाखोपशाखांचे ज्ञान होते पण त्यांचे मूळ (सत्य) समजत नाही. ऋषींना विज्ञानाची गरज नसेल व विज्ञानाला ऋषींची गरज नसेल, पण मानवाला मात्र दोन्हींची आवश्यकता आहे." (The Tao of Physics)

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



**प.पू. श्री. मंगेशदादा फडके**



# अगोराफोबिया (Agoraphobia)

**संजय...**

घड्मऽऽऽ घुम जोरात काही आपटण्याचा आवाज आला. मी पळतच खोलीतून बाहेर आलो. बघतो तर काय ? सविता, माझी. अर्धांगिनी कंबर धरुन उभी होती. आणि तिच्यासमोर कलंडलेली बादली आणि खोलीभर पाणी.

झाले असे होते, भरलेली बादली उचलण्याने अचानक सविताच्या पाठीतून जबरदस्त कळ आली होती, आणि बादली हातातून निसटली होती. थोडेसे प्रथमोपचार केले आणि तिच्या -मागे लागलो "चल आपण ऑर्थोपेडीक सर्जनकडे जाऊ." हिचा आपला 'नन्नाचा पाढा. "नको, मला काही झाले नाही कशाला उगाच डॉक्टर- बिक्टर. "

मला ना आजकाल हिची खूप काळजी वाटते. आमच्या लग्नाला सात वर्षे झाली. नांदेडहून लग्न करुन जेव्हा मुंबईला आलो तेव्हा कसली भन्नाट होती, सविता. अखंड हिच्याजवळ काही ना काही सांगण्यासारखे असायचे. हो तर मग ! होतेच सविताचे नेटवर्क जबरबस्त ! एकतर हिच्या मित्रमैत्रिणींचां गोतावळा भरपूर त्यात घरी येणाऱ्या जाणाऱ्यांचा राबताही भरपूर आणि तोंडी लावायला वेळी अवेळी आपलेपणाने येणारे शेजारी, नातेवाईक मग काय? चविष्टपणे चघळण्यासारख्या भरपूर गोष्टी असत सविताकडे, पण मुंबईला आलो आणि हळूहळू सर्व बदलतच गेले. माझी आय.टी. ची नोकरी त्यामुळे सतत कामात डुंबलेला मी. कधी कधी तर ओव्हरलोड किंवा डेडलाईनमुळे शनिवार, रविवार सुध्दा ऑफीसला जावे लागे. आणि परदेशी कस्टमर असतील, तर रात्रीचा दिवस करावा लागत असे.

सविता BCA झालेली, परंतु अजून तरी तिने नोकरीच्या जाळयात स्वतःला अडकवून घेतले नव्हते. दोघेही नोकरीच्या चक्रात अडकलो, तर घड्याळाच्या आतल्या चक्रासारखे काही कालच एकमेकांसमोर येऊत. मग संसारात काय गोडी? असे तिचे मत.

परंतु, आजकाल मात्र तिच्या वागण्यातला बदल मला ठळकपणे जाणवू लागला आहे. मला कधी नाईट ड्युटी करावी लागली, तर ही चक्क टीव्ही चालू ठेवून झोपते. कारण काय? तर म्हणे "कोणी सोबत असल्यासारखे वाटते.”
आता आमचा फ्लॅट दहाव्या मजल्यावर, लिफटने तर यावे -जावे लागणारच ना? तर अर्धे मजले होतात न होतात तोच लिफ्ट थांबवते आणि बाकी मजले चढते किंवा उतरते. काय तर म्हणे “गुदमरल्यासारखे होते मला”.
परवा तर... संध्याकाळची वेळ म्हणजे डास महाराजाच्या आगमनाची वेळ, म्हटले खिडक्या बंद करुन घ्याव्यात, तर बाईसाहेब तिरमिरीत उठल्या आणि खिडक्या काय, फ्लॅटचे दारही सताड उघडून ठेवले. “सगळं सगळं बंद करुन टाक, मला अडकल्यासारखे होते. एक दिवस जीव जाईल माझा, मग होईल तुझे समाधान!” अशी तोंडाने तोफ डागल्यानंतर माझी काय हिंमत पुन्हा दार लावण्याची. गेल्या रविवारची गोष्ट, आमच्या जवळच्या नातेवाईकांचे लग्न होते दादरला. सविता काही दादरला येण्यास राजी नाही. काय तर म्हणे "तेवढ्या गर्दीत गेले तर मी बाहेरच नाही येऊ शकणार. एकतर गुदमरून तरी जीव जाईल नाहीतर चेंगरून तरी." खूप समजावले शेवटी एकटाच गेलो लग्नाला.
असो आता हिच्या पाठीच्या दुखण्याकडे नको दुर्लक्ष करायला. थोडे जबरदस्तीने का होईना, न्यायलाच हवे डॉक्टरकडे.

**सविता......**

घरी आले सपासप थंड पाणी तोंडावर मारले, फॅन लावला. सर्व खिडक्या उघडल्या तेव्हा कुठे थोडे बरे वाटले. नको नको म्हणत होते, तरी घेऊन गेला संजय डॉक्टरकडे. आणि हा सगळा तमाशा झाला. आता मी काय मुद्दाम करते का हे सगळं? मला खरंच त्रास होतो, समजत कसे नाही संजयला?डॉक्टरांना काय जाते (MRI) करुन घ्या म्हणायला, एवढी मोठी बंद खोली त्यात ते अजस्त्र मशीन. मी किती हिंमतीने आत गेले होते. पंधरा-वीस मिनिटे त्या वातावरणात अॅडजस्ट करण्याचा प्रयत्न सुध्दा केला. थोड्या वेळाने अगदी घाबरल्यासारखे झाले. आपला श्वास इथेच बंद पडतो की, काय असे झाले. मग मी आरडाओरडा करून तिथून सुटका करून घेतली. संजयच्या चेहऱ्यावर काळजी, भीती, राग, अपमान या सर्वांचे मिश्र भाव झळकत होते. पण माझा नाईलाज होता ना? आजकाल संजयला माझी प्रत्येक गोष्ट चुकीचीच वाटते. काल कारचा एसी बंद करून खिडक्या उघडल्या, तरी अस्वस्थ वाटले, म्हणून कार थांबवली मोकळी हवा खाण्यासाठी, ते नाही आवडले संजयला. नांदेडला जाताना टू टायर / थ्री टायरचे नको, स्लीपरचे काढ तिकीट. मोकळे हवेशीर वाटते. ते नाही पटले संजयला. बाथरुममध्ये जास्ती वेळ झाला तर जेलसारखे गुदमरते मला. असे म्हणल्यावर तर हसतच बसला. वॉल्वोच्या बंद एसी बसमध्ये मी पुण्याला नाही येत म्हटले, तर वाद घालत बसला.
मला काय होते ते माझे मलाच ठाऊक. परवा महाभारताचा अभिमन्यूवाला एपिसोड पाहत होते, टीव्हीवर तर त्याच्याजागी मीच दिसू लागले. मी कुठल्या तरी चक्रव्यूहात अडकत चालले आहे. माझा केव्हाही जीव जाऊ शकतो. कोणी नाही येणार मदतीला असे वाटले. दरदरून घाम फुटला.

**संजय**

"काही काळजी करू नकोस, सर्व काही पहिल्यांसारखे होईल" असे म्हणून एक आश्वासक थाप डॉक्टर मित्राने माझ्या पाठीवर दिली आणि माझे मन शांत झाले. "ही अगोराफोबियांची केस आहे. आणि यावर उपाय सुध्दा आहेत. अगोराफोबियां म्हणजे 'अवास्तव भीती'. आपण एखादया परिस्थितीत अडकून जाऊ आणि त्यातून आपण बाहेरच नाही पडू शकणार असे वाटणे.

आपण वहिनींना आधी विश्वास देऊयात की, त्यांना काहीही घाबण्यांसारखे झालेले नाही आणि मग पायरी पायरीने त्यांच्यावर उपचार करुयात."

डॉक्टरच्या पहिल्याच आश्वासक वाक्यांनी माझ्या डोक्यावरचा अर्धा भार उतरला होता. आणि मी सविताची केस माझ्या मानसोपचारतज्ज्ञ मित्रांकडे सोपवली.

**डॉक्टर**

सविताला आधी हे समजावले गेले की, तिला जर गुदमरल्यासारखे अस्वस्थ वाटत असेल तर तिला एकतर श्वसनाशी संबंधित विकार किंवा हार्टशी संबंधित विकार असावा लागेल, परंतु डॉक्टर रिपोर्ट तर सर्व नॉर्मल दाखवत आहेत. म्हणजे आजारामुळे तुमचा जीव जाण्याची अजिबात भीती नाही. भीतीच्या मानसिकतेमुळे स्नायूचा टोन वाढतो. हार्टबीट वाढतात. असे झाले, की नेहमी काही हार्टअॅटकच आला पाहिजे असे काही नाही. तर अस्वस्थपणा सुध्दा वाढू शकतो. राहता राहिला प्रश्न असे का होते त्याचा. एक रोप जर एका ठिकाणाहून उपटून दुसरीकडे लावले तर ते प्रथमतः थोडेसे कोमेजतेच ना? तसाच थोडासा हा प्रकार आहे.

तुम्ही भरल्या घरातून लग्न होऊन शहरातल्या फ्लॅट संस्कृतीत गेलात. त्यात संजयचा सहवास दुर्मीळ होत चालला. आणि प्रत्येक व्यक्तीला जे मोकळे आकाश लागते व्यक्त होण्यासाठी ते नकळत बंद होत गेले. आणि तुमच्या मनाला मोकळे होण्याची ओढ लागली. इतके साधेसे कारण आहे. तुम्ही मला पूर्ण सहकार्य करा. मी तुमच्या भीतीला पळवून लावतो. मी वहिनीना एक Low anxiolytic dose देऊन घरी पाठवले.

आठ महिन्यानंतर संजय सविता दोघेही फ्रेश मूडमध्ये पेढयांचा पुडा घेऊन 'गोड बातमी' देण्यासाठी आले. आणि मला एक मानसोपचार तज्ज्ञ म्हणून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले.

सविता दुसऱ्यांशी बोलण्यांत गुंतली आहे हे बघून संजय म्हणाला, "हिला नॉर्मलला आणण्यांची किमया तू कशी काय साधलीस?"



"हे बघ संजय, साधारणतः महिला वर्गामध्ये (Anxiety Disorder) बैचेनीचे आजार, याकडे झुकण्याची मानसिकता असतेच आजूबाजूचे वातावरण आजाराला पोषक असेल, तर त्या लगेच या आजाराकडे वळतात 'सिरोटोनिन' नामक मेंदूतील रसायनाच्या कमतरतेमुळे असा आजार होतो.'

मी पहिल्यांदा वहिनींना चार ते पाच आठवडे गोळया सुरू केल्या. मग हळूहळू त्यांच्याशी सुसंवाद साधत उदाहरणे देत त्यांची मानसिकता स्थिर करण्याचा प्रयत्न केला उदा. त्यांना म्हटले "जर तुमची आतेबहीण तुमच्याकडे आली आणि म्हणाली, की, मला एकटं राहण्यांची खूप भीती वाटते तर . तुम्ही त्यांना काय सल्ला द्याल ? वहिनी म्हणाल्या, "घाबरतेस कशाला स्वातंत्र्य एन्जॉय कर ना!"

"मग जो सल्ला तुम्ही तुमच्या बहिणीला दिलात, तोच तुम्ही तुमच्या जीवनात लागू करू शकता" हे दाखवून दिले. काही आठवडयानंतर त्यांच्यात सुधारणा दिसताच, शवासनासारखे योगासनाचे प्रकार करण्यास सांगितले. यामध्ये आपण ग्रुप ऑफ मसल्सना टोनींग करतो आणि सैल सोडतो. ते या आजारासाठी खूप आवश्यक आहे.

एकीकडे गोळयांचे प्रमाण कमी कमी करत जाणे आणि दुसरीकडे सुसंवाद आणि (Behavioral exercise) बिहेव्हीअरल एक्सरसाइजचे प्रमाण वाढवत नेणे असा बॅलन्स साधला आणि रिझल्ट तुझ्यासमोर आहे”.

“वेळीच मानसोपचार घेतले ते फार छान झाले बाबा ! वेळीच घातलेला एक टाका पुढचे दहा टाके वाचवतो." असे म्हणत संजयने एक दीर्घ सुस्कारा टाकला.



**रश्मी वडवळकर**

# सफरचंदाचं लोणचं

**सा**हित्य (Ingredients) :
हिरवे सफरचंद Green apples): दोन मध्यम, कडक आणि आंबट सफरचंद ( ग्रॅनी स्मिथ), धुवून, पुसून बारीक तुकडे केलेले
तेल: दोन मोठे चमचे (तिळाचे किंवा शेंगदाण्याचे तेल)
मोहरी: एक लहान चमचा
लाल तिखट: दोन मोठे चमचे (तुमच्या आवडीनुसार कमी-जास्त करा; काश्मिरी तिखटाने रंग छान येतो)
मेथी पूड: एक लहान चमचा (मेथी दाणे भाजून केलेली पूड)
हिंग: दीडलहान चमचा
मीठ: दीड लहान चमचा (किंवा चवीनुसार)
लिंबाचा रस: एक लहान चमचा (ऐच्छिक, अधिक आंबटपणासाठी)



कृती (Instructions) :
सफरचंद स्वच्छ धुवून, कोरडे करून त्याचे लहान तुकडे करून घ्या. सफरचंद काळी पडू नयेत, म्हणून मसाला मिक्स करायच्या अगदी आधीच ते चिरा. तुकडे एका स्वच्छ भांड्यात काढा.मसाले टाका: सफरचंदाच्या तुकड्यांवर लाल तिखट, भाजलेली मेथी पूड, हिंग आणि मीठ टाका.फोडणी तयार करा: एका छोट्या कढईत किंवा पळीत तेल मध्यम आचेवर गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात मोहरी टाका आणि मोहरी छान तडतडू द्या.मिक्स करा: ही गरम फोडणी सफरचंदावर टाकलेल्या मसाल्यांवर ओता. एका स्वच्छ चमच्याने सर्व मिश्रण व्यवस्थित एकत्र करून घ्या.मुरवून घ्या: हे लोणचे तीस मिनिटे ते एक तास बाजूला ठेवून द्या, जेणेकरून सफरचंदाचे तुकडे मसाले छान शोषून घेतील. तुमचे झटपट ॲपल लोणचे तयार आहे!
साठवणूक (Storage): हे झटपट लोणचे एका स्वच्छ, सुक्या काचेच्या बरणीत भरून फ्रीजमध्ये ठेवा. हे फ्रीजमध्ये दोन आठवड्यांपर्यंत छान टिकते.



दीप्ती पाटखेडकर

# शब्दकोडे उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 दी | प | 2 मा | ळ | | 3 फे | | 4 अ | 5 क | स्मा | 6 त |
| घों | | गि | | 7 फ | टा | 8 के | | मा | | रू |
| 9 यु | गु | ल | गी | त | | 10 र | ज | नी | कां | त |
| षी | | दा | | 11 वा | 12 न | वा | | व | | ळी |
| | 13 प | री | 14 स | | ग | | 15 वि | र | 16 स | |
| 17 ग | ण | | 18 वा | व | र | णा | रा | | 19 का | ठी |
| | 20 ती | 21 न | शे | | द्वा | | 22 ट | 23 वा | ळ | |
| 24 म | | र | | 25 च | र | 26 स | | न | | 27 प |
| 28 हा | नी | का | र | क | | 29 म | हा | प्र | सा | द |
| पौ | | सू | | 30 ली | 31 ल | या | | स्था | | भा |
| 32 र | डा | र | ड | | य | | 33 दा | न | शू | र |

# गणेशोत्सव २०२६ कार्यक्रमातील क्षणचित्रे











WELCOME

# mmc च्या हौशी सुगरणी


माधुरी प्ऱ्हाड


अर्चना श्रीपाल


पल्लवी पाटील


मनीषा पंडित


स्नेहा कुलकर्णी


धनश्री कुलकर्णी


प्रिती उंडाळे


मंजिरी पुराणिक


पूजा नेरसेकर


अपर्णा पाटील


दिपाली सावंत


सिद्धी सावंत

# 'भाई' गिरी






# इतर उपक्रम



अथर्वशीर्ष पठण





स्नेहबंध



मंगळागौर

# mmc ढोलताशा











# स्नातक कौतुक सोहळा



# MMC सहल










‘असेन मी नसेन मी’ नाटकाच्या चमूसोबत




'भाई' गिरी टीम @ BMM सिॲटल



BMM कार्यकारिणी २०२६-२०२८

# MMC झूम कट्टे व त्यांचे आयोजक

## MMC साहित्यकट्टा



दिपाली सावंत (EC)



माधव गोगावले



श्रद्धा भट



मंजुषा पांडे



अश्विनी कुंटे

## mmc अध्यात्मपीठ



सुजित कुळकर्णी (EC)



उर्मिला दामले



रेखा देवधर



माधव गोगावले



शिल्पा देशपांडे



हर्षा थत्ते



दिपाली सावंत

## mmc आम्ही सारे गवय्ये



आशिष नगरकर (EC)



रश्मी चाफेकर



मनीषा प्रभू



अनिरुद्ध भिडे



मीनाक्षी हेडाऊ



हेमा साखरदांडे



देवेन्द्र औटी



दिपाली सावंत

## MMC इतिहासमंच



चेतन रेगे (EC)



ब्रिजेन
सावंत



माधव गोगावले



अश्विनी कुंटे



अनिकेत सावंत



दिपाली सावंत

## MMC YOUTH



मोनिका पाटणकर (EC)



श्वेता हरणखेडकर



शीतल देशपांडे



रत्नांगी मालपेकर



दिपाली सावंत

MMC पूर्णब्रह्म (Food)



पल्लवी पाटील (EC)



शीतल देशपांडे



शिल्पा संत



दिपाली सावंत

## mmc योगसाधना



दिपाली सावंत (EC)



विशाल नवलकर



उर्मिला दामले

## MMC भ्रमणगाथा



अनघा देऊळकर (EC)



वैशाली बेलसरे



रत्नांगी मालपेकर



कविता कुलकर्णी



दिपाली सावंत

## MMC अर्थविचार



ब्रिजेन सावंत (EC)



मंदार जोगळेकर



चैतन्य आगाशे



चेतन रेगे
(EC)



दिपाली सावंत

mmc आरोग्यधाम



दिपाली सावंत (EC)



उल्का नगरकर



पल्लवी बेटसूर



नमीता वेदक

## mmc आरास



मनीषा पंडित (EC)



शलाका सावंत



काबेरी पाटील



हृषिकेश घोडके



दिपाली सावंत

# mmc धिनक धिन धा



प्रीती उंडाळे (EC)



सिद्धी सावंत



दिपाली सावंत

## mmc परंपरा



अनघा देऊळकर (EC)



मनीषा पंडित



माधुरी पऱ्हाड



राधिका देसाई



दिपाली सावंत

## MMC फिटनेस क्लब



ब्रिजेन सावंत (EC)



विशाल नवलकर



दिपाली सावंत

## mmc फॉरेव्हर यंग



दिपाली सावंत (EC)



माधव गोगावले



कश्मिरा मगर



ज्योती गोगावले

## mmc शिकागोची बाग



दिपाली सावंत (EC)



श्वेता हरणखेडकर



भास्कर शेडगे



कविता वाडकर

## mmc ढोलताशा



ऋषिकेश घोडके (EC)



सदानंद जोशी



चैतन्य आगाशे



दिपाली सावंत

## mmc भजनसेवा



मनीषा पंडित (EC)



नयना शेलार



मंगला गडकरी



मुक्ता मनोहर



जयश्री यादव



दिपाली सावंत

# mmc झूम कट्ट्यांच्या कार्यक्रमपत्रिका







महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
**अध्यात्मपीठ**
गुरुवार 3 सप्टेंबर २०२६
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
भारतीय वेळ शुक्रवार सकाळी ६:३०
एकनाथी हरिपाठ निरूपण भाग १
वक्ता
आ. श्री. प्रमोददादा वाळवेकर
• शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले,
अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, सुजीत कुलकर्णी, दीपा सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
**अध्यात्मपीठ**
गुरुवार दिनांक २ जुलै २०२६
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
मदालसा उपदेश सत्र २
निरुपणकार
श्रीदत्त राऊत
• शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे,
ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते,
सुजीत कुलकर्णी, दीपा सावंत



महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
इतिहास मंच व अध्यात्मपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रस्तुत करत आहोत
बुधवार, २० मे २०२६ शिकागो वेळेनुसार रात्री ८ ते ९:३०
(भारतीय वेळेनुसार गुरुवार, २१ मे सकाळी ६:३० ते ८:००)
कीर्तन परंपरा: इतिहास, समाज प्रबोधन आणि अध्यात्म
वक्ते: ह. भ.प. प्रा. डॉ उदय चंद्रकांत पाटकर
आयोजक: चेतन रेगे, माधव गोगावले, ब्रिजेन सावंत, अश्विनी कुंटे, अनिकेत सावंत, रेखा देवधर,
शिल्पा देशपांडे, उर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, सुजित कुलकर्णी, दीपाली सावंत




Itihas Manch Session # 182
महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच
प्रस्तुत करत आहे: विशेष व्याख्यानमाला
अयोध्या श्रीराम मंदिर:
आव्हाने आणि निर्मिती - भाग २
YouTube
ZOOM
Meeting ID: 992 6524 2906
Passcode: itihas
|| रामो विग्रहवान् धर्मः ||
वार : बुधवार
दिनांक : बुधवार, ९ सप्टेंबर २०२६
वेळ : रात्री: ८:०० – १०:०० CST
व्याख्याता:
सौ. अश्विनी कवीश्वर
आयोजक: चेतन रेगे, माधव गोगावले, ब्रिजेन सावंत, अश्विनी कुंटे, व दीपाली सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
'साहित्यकट्टा' व 'इतिहास मंच' यांच्या संयुक्त विद्यमाने सादर करत आहेत
'बोलका कट्टा'
'मराठी भाषेवर अन्य भाषांच्या प्रभावाचा इतिहास'
डॉ. सिसिलिया कार्व्हालो
बुधवार, दि. - २७ मे २०२६, संध्या. ८ वा. (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, दि. - २८ मे २०२६, सकाळी ६.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
आयोजक - साहित्यकट्टा आणि इतिहास मंच चमू २०२६


महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे: विशेष व्याख्यान
Ithas Manch Session # 174
प्रतिशोध ...! – भाग २
सरसेनापती संताजी घोरपडे यांचा तुळापूरचा सर्जिकल स्ट्राईक !
दिनांक व वेळ: बुधवार, ३ जून २०२६, रात्री: ८:०० – ९:३० CT
"... तुळापूरचे मुक्कामी जाऊन बरायखुद पादशाहा यांजवर छापा मी घालितो. मराठे आहेत असे खांशास कळवून येतो ... !"
– सरसेनापती संताजी घोरपडे ममलकतमदार
विंग कमांडर शशिकांत ओक
YouTube
zoom
Meeting ID: 992 6524 2966
Passcode: Itihas
आयोजन: चेतन रेगे, माधव गोगावले, त्रिजेत सावंत, अश्विनी कुंटे, अनिकेत सावंत, आणि दीपाली सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो येथील
भ्रमण गाथा कट्टा घेऊन येत आहेत
हिरॅम बिंगॅहम ने "शोधलेलं" परंतु त्याही आधी
इन्कांनी स्थापलेलं असं जे जगप्रसिद्ध स्थळ आहे
ते म्हणजे पेरु तलं माच्चूपिच्चू! या स्थळाला एक
भेट देऊ या माधवदादा गोगावलेंबरोबर...
चला, येताय ना ?
केव्हा? - मंगळवार २२-सप्टेंबर
किती वाजता ? - रात्री ८ वाजता
झूम लिंक व पासवर्ड ग्रुप डिस्क्रीप्शन मधे आहेच !
धन्यवाद 🙏 - दीपा कामत, वैशाली बेलसरे, रत्नांगी
मालपेकर, अनघा देवूलकर, कविता कुलकर्णी


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६ प्रस्तुत..
MAHARASHTRA MANDAL CHICAGO
नर्मदे हर 🙏🙏
माँ नर्मदा ❤️🙏
बरोब्बर ओळखलंत !
नर्मदा परिक्रमेवर आपण या महिन्याचे सेशन करतोय. पण ही जरा नोकरदार लोकांना करता येईल अशा प्रकारची परिक्रमा आहे. ज्यात महिनोनमहिने सुट्टी घ्यायला लागत नाही. म्हणजे नक्की काय? जाणून घ्यायला या !
सादर करतायत..
मंजिरीताई वैशंपायन
रेखाताई आणि सुभाषदादा देवधर
आणि हो,
ही महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या भ्रमणगाथा ग्रूपने अध्यात्म पीठा बरोबर केलेली सामायिक प्रस्तुती आहे !!
केव्हा? - मंगळवार २६-मे
किती वाजता ? - रात्री ८ वाजता
मीटिंग डिटेल्स ग्रुप डिस्क्रीप्शन मधे आहेतच!


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
'साहित्यकट्टा' तर्फे 'बोलका कट्टा' या कार्यक्रमात सादर करत आहे,
'आनंदाचे डोही'
तृप्ती सरदेसाई
चंद्रशेखर ठाकूर
बुधवार, दि. - ३० सप्टेंबर २०२६, संध्या. ८ वा. (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, दि. - १ आक्टोबर २०२६, सकाळी ६.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
आयोजक : माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे, दिपाली सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
'साहित्यकट्टा' तर्फे 'बोलका कट्टा' या कार्यक्रमात
सादर करत आहे,
सखा आणि सख्खा
सादरकर्ता : मनोहर वठारकर
बुधवार, दि. - २४ जून २०२६, संध्या. ८ वा. (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, दि. - २५ जून २०२६, सकाळी ६.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
आयोजक : माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे, दिपाली सावंत,


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
'साहित्यकट्टा' तर्फे 'बोलका कट्टा' या कार्यक्रमात,
थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त सादर करत आहोत -
'माय माझी सरसोती'
अलका वठारकर
सुगंधा देवधर
तृप्ती सरदेसाई
दीपा राव
बुधवार, दि. - १९ ऑगस्ट २०२६, संध्या. ८ वा. (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, दि. - २० ऑगस्ट २०२६, सकाळी ६.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
साहित्यकट्टा' आयोजक : माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे, दिपाली सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६ व जागतिक मराठी अकादमी
आयोजित
कवी संमेलन
सहभागी मान्यवर कवी
दशरथ परब
अंजली कुलकर्णी
प्रकाश होळकर
रमजान मुल्ला
गोपाल मापारी
इंद्रजीत घुले
बुधवार, दि. - २२ जुलै २०२६, संध्या. ८ वा. (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, दि. - २३ जुलै २०२६, सकाळी ६.३० वा. (भारतीय वेळेनुसार)
साहित्यकट्टा आयोजक : माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे, दिपाली सावंत
आणि जागतिक मराठी अकादमी सर्व कार्यकारिणी मंडळ



# धन्यवाद